# भक्ति-कुंज

०१.२५
म. ग्रं. मं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ७५५४



१९२५.

REFBK 0002878
REFBK-0002878

संपादक
ना. न. फडणीस
जळगांव.

REFBK-0002878
REFBK-0002878

ग्रा. क्र. २८५४०

# भक्ति-कुंज

प्रपंच, परमार्थ व भक्तिपर
संतांचीं वचनें
यांचा नित्य पाठ करणारा
करितां

तयार केलेला ग्रंथ

नारायण नरसिंह फडणीस
यांनीं आपल्या बाबजी स्टीम प्रिंटिंग प्रेस, जळगाव
येथें छापून जळगांव येथें प्रसिद्ध केला.

सन १९२५

किंमत १२ आणे.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन. )

# भक्ति-कुंज

## नमन-श्लोक

नमो श्रीगणेशा ! नमो शारदे गे !
नमो सद्गुरो गा ! नमो संतगंगे !
नमो सत्कवीशा ! नमो माय गोदा[1] !
नमो तातरूपा शरण्या मुकुंदा[2] ! १

## प्रार्थना पद

दे इतुकें मज देवा, नित्य घडो तव सेवा ॥ दे० ॥
तव वदनातें पाहायाला नेत्रीं भाव भरावा ॥ दे० ॥
तव गुणकीर्तन ऐकायाला कर्णी नाद जडावा ॥ दे० ॥
तव चरणाश्रित सत्पुरुषांचा घ्राणा गंध रुचावा ॥ दे० ॥
मधुनामें तव घोषायाला वाचे छंद असावा ॥ दे० ॥
वंदन-टाळी यांचा चाळा हातांठायिं वसावा ॥ दे० ॥
मंदिरमार्गी चालायाला पायां नेम घडावा ॥ दे० ॥
तव पद संतत चिंतायाला चित्तें ध्यास धरावा ॥ दे० ॥
परधनकांतेठायीं जीवा लोभ कधींहि नसावा ॥ दे० ॥
जरि देशी ना हें हरि माधव जीवभाव निरसावा ॥ दे० ॥

---

१ गोदावरी—कविमाता २ माधव उर्फ मुकुंद कविपिता.

श्लोक

तुझे वंदुनी पाय सीताभिरामा
तुला मागतों शोकचिंताविरामा
तुझा छंद लागो समर्था त्रिकालीं
तुझें नाम येवो मुखीं अंतकालीं १

## भक्ति-माहात्म्य

श्लोक

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद

वैकुंठीं न वसें, वसें न हृदयीं मी योगियांच्या तरी
माझा वास न नारदा रविवरी नान्यत्र, नानापरी
गाती भक्त सुखें मला गुणकथा माझ्याचही ऐकती
तेथें तिष्ठत नित्य मी मुनिवरा सानंद सांगों किती

काव्यार्णवसुधा

अभंग

भक्तिपंथ बहु सोपा । पुण्या नागवे या पापा ।
येणें जाणें खेपा । येणेंचि एके खंडती १
उभारूनि बाहे । विठो पालवीत आहे
दासा मीच साहे । मुखें बोले आपुल्या २

तुकाराम

पद

भक्तीं आकळिला । दयाघन भक्तीं आकळिला ॥ ध्रु० ॥
पार्थरथीं सारथ्य करी जो । निजपद दे बळिला ॥ १ ॥
प्रल्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं । दानव निर्दळिला ॥ २ ॥
रुक्मिणिनें एका तुळसिदळानें । गिरिधर प्रभु तुळिला ॥ ३ ॥

गिरिधर

## भक्ति-योग

श्रीमद् भगवद्गीतिचे अध्याय अठरा आहेत. त्या अठरा अध्यायांत सप्त॰शत ह्मणजे सातशें श्लोक आहेत. त्या प्रत्येक श्लोकाला चार चरण आहेत. " तरी अर्थ पाहतां त्यांमाजीं भिन्न मत नाहीं. " श्री ज्ञानेश्वर ह्मणतात.

" जैशीं अनेक रत्नें पाहीं, एकाचि सूत्र ओंविती
" किंवा मोत्यें असोनि पुष्कळ, ह्मणती एक सराची माळ
" आणि पाहतां केवळ । एकचि होय सकळांची ॥
" मालेमाजीं पुष्पें अनेक, परी सुगंधाचें रूप एक,
" त्यापरी येथें श्लोक । आणि अध्याय जाणावे ॥
" गीतेचे सप्तशत श्लोक । अध्याय अठरा परी एक,
" तत्व बोलिला जगन्नायक । अद्वैतपणें सर्वत्र ॥ .'

ह्या अद्वैतपणें सर्वत्र बोलिलेल्या एकतत्वाविषयीं अध्याय १८ वा श्लोक ६८ वा येथें भगवंत ह्मणतातः—

य इदम् परमम् गुह्यम् मद्भक्तेष्वभिधास्यति
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः

या भगवद्वचनाचा अनुवाद यथार्थ दीपिकाकार वामन पंडित यांनी केला आहे तो असाः—

" अगा ! हें गुह्य परम । मथन करूनि सर्वहि नियम
" काढिलें कीं सर्वहि मीच पुरुषोत्तम । गुह्य उत्तमोत्तम हें ऐसें
" माझिया भक्तांचमाजीं यातें । जो सांगेल तो सर्वेश्वरातें मातें
" पावेल ये विषयीं संशयातें । मानूं नको सर्वथा ॥
" कीं जो असेल माझा भक्त । तोचि हें शास्त्र भक्तियुक्त
" जे माझे चरणीं अनुरक्त । त्यातेंचि हे सांगेल ॥
" परंतु जे रीति करूनी । हें परमगुह्य वाखाणुनी ।
" मज पावेल ह्मणुनी । ह्मणतों ते रीति अर्जुना ऐक ॥

"कीं सर्वत्र या गीतेंत । भक्तीतेंची मी भगवंत
"श्रेष्ठ करुनी अत्यंत । सर्वांपरीस बोलिलों ॥
"तैसीच्रि रीति अवलंबुनी । जे माझेठायीं भक्तितेंचि थोर करुनी
"माझ्या अतिशयोक्तिकरूनी । जो सांगेल ॥
"अवलंबूनी ऐसी रीति । अणि सांगेल माझ्या भक्तांप्रति ।
"भक्ति थोर ऐशी व्याख्या करील सुमती । तो निःसंशयें
मातेंचि पावेल ॥

हें परम गुह्य तत्व, हें गीतार्थाचें सार, हें गीतारहस्योत्तम १२ व्या अध्यायांत स्फुट केलें आहे. तो अध्याय पुढें दिला आहे. त्या अध्यायाच्या प्रास्ताविक ओंव्या यथार्थदीपिकाकार वामन पंडित यांनीं अप्रतिम रचिल्या आहेत; त्यांत पंडित ह्मणतातः—

"जयजय भक्तैक सुलभा । जयजय तदन्य दुर्लभा ।
"जयजय अनादिमायावल्लभा । जगधिष्ठान जगद्गुरो ! ॥
"देवाधिदेवा शुकादिक । जीवन्मुक्त तुझे उपासक ।
"अनायासें तरले बहुतेक । जे ज्ञानी होउनीही सगुण भजती ॥
"ज्ञान झालिया नंतर । कोणी सगुणाचा त्यजिती आदर ।
"ते निर्गुणोपासक नर । निर्गुणा तूंतेंचि पावती ॥
"परी त्या अव्यक्तोपासकां अत्यंत क्लेश । आणि ज्ञानियां भक्तांस
"नलगे आयास–लेश । या द्वादशाध्यायांत तूं हृषीकेश ।
"गुह्य सिद्धांत बोलसी ऐसा ॥

या भक्तियोग नामक अध्यायांतील 'ज्ञानी अधिक कीं भक्त अधिक' या प्रश्नासंबंधानें सुगम–बोधकार ह्मणतातः–व्यक्त ( सगुण ) व अव्यक्त ( निर्गुण ) दोन्ही एकच, हें बुद्धीनें कळलें मात्र, परंतु ही जाणीव, हें अपक्व ज्ञान दृढ होऊन वृत्ति तदाकार होण्याकरितां कोणी सगुण तर कोणी निर्गुण उपासना करितात; तात्विक जाणीव दोघांनाही आहे, परंतु तत्वानुसार आचार, कृति, वृत्ति होण्याकरितां जी उपासना करावयाची ती एकविध नसून

द्विविध आहे—एक सगुणोपासना व दुसरी निर्गुणोपासना. सगुणोपासकांस भक्त व निर्गुणोपासकांस ज्ञानी अथवा योगी या विशिष्ट संज्ञा प्रचलित आहेत. दोघांचेंही साहित्य एकच—जाणीव (अपरोक्षज्ञान), अभ्यास, निष्ठा अथवा सविश्वास दृढ निश्चय: दोघांचेंही अंतिम—साध्य एकच, सायुज्यता; अर्थात् दोन्ही प्रवाह एकाच सागराला जाण्याच्या उद्योगांत असलेले; एक सरळ, धोपट, सोप्या मार्गानें जाणारा, तर एक दऱ्या खोऱ्यांच्या विकट प्रदेशांतून वक्रगतीनें तस्मात् कष्टानें क्रमण करणारा: अथवा दोघां शहाण्या मुलांतून एकाचा उद्योग प्रेमाच्या सौम्य सोप्या, गोड उपायांनीं वडिलांची सत्ता मिळविण्याचा तर दुसऱ्याचा ज्ञानाच्या बळावर ती सत्ता पटकावण्याचा; दोहोंत अधिक श्रेयस्कर कोणता ? सर्वसाधारणरीत्या सुलभ तोच श्रेयस्कर मार्ग हाच सिद्धांत यथार्थ होय अशाच प्रकारें गीतेच्या १२ व्या भक्तियोग अध्यायांत निर्णय दिला आहे. 'कर्म कर सोडूं नको' असा उपदेश आहे ह्मणून कर्मपर आणि 'फलाशा आणि कर्तृत्वाहंकार सोड' 'कर्म कृष्णार्पण कर' असा उपदेश आहे ह्मणून सन्यासपर असा उभयपक्षीं हितकर निर्णय केलेला आहे.

---

## श्रीमद् भगवद् गीता अध्याय १२ वा.

### अर्जुन उवाच

एवम् सतत युक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

### श्री भगवान् उवाच.

मय्यावेश्यमनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥
ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।
सर्वत्रगमचिंत्यंच कूटस्थमचलं ध्रुवम ॥ ३ ॥

संनियम्यैंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः॥ ४॥
क्लेशोऽधिकतरस्तेषां अव्यक्तासक्तचेतसाम्।
अव्यक्ता हि गति दुःखं देहवद्भिरवाप्यते॥ ५॥
ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते॥ ६॥
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥ ७॥
मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।
निवसिष्यसि मय्येव अतऊर्ध्वं न संशयः॥ ८॥
अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय॥ ९॥
अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि॥ १०॥
अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान्॥ ११॥
श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ज्ञानात् ध्यानं विशिष्यते।
ध्यानात् कर्मफलत्याग स्त्यागाच्छांतिरनंतरम्॥ १२॥
अद्वेष्टासर्वभूतानां मैत्रः करुण एवच।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखःक्षमी॥ १३॥
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तःस मे प्रियः॥ १४॥
यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।
हर्षामर्षभयोद्वेगै मुक्तो यः स च मे प्रियः॥ १५॥
अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः।
सर्वारंभपरित्यागी भक्तिमान् यः स मे प्रियः॥ १६॥

योऽन हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभपरित्यागी यो भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥
समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ १८ ॥
तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतःस्थिरमतिर्भक्तिमान् मे प्रियो नरः ॥ १९ ॥
ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियः ॥ २० ॥

## वेंचे दासबोधांतील.

### नवविधाभक्तिनिरूपण.

#### ओंव्या.

श्रवण, कीर्तन, नामस्मरण, । पादसेवन, अर्चन, वंदन, ।
दास्य, सख्य, आत्मनिवेदन, । ऐसें हें नवविधा ॥

#### श्रवण ( १ )

प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथापुराणश्रवण ।
नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें ॥ १ ॥
सगुण देवांचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्वयंत्रें ।
हीं दोन्हीं परम पवित्रें । ऐकत जावीं ॥ २ ॥
ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार तें जाणोनि टाकावें । या नांव श्रवणभक्ति ॥ ३ ॥

#### कीर्तन ( २ )

सगुणहरिकथा करावी । भगवत्कीर्ति वाढवावी ।
अखंड वागीश्वरी वदवावी । या नांव कीर्तनभक्ति ॥ ४ ॥

नवरसिक शृंगारिक । गद्यपद्याचें कौतुक ।
नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥ ५ ॥

सत्य समाधान तें उडे । नीति न्याय साधन मोडे ।
जेणें सद्भाव बिघडे । ऐसें न बोलावें ॥ ६ ॥

**सगुण हरिकथा या नांव कीर्तन । अद्वैत ह्मणजे निरूपण ।**
**सगुण जें तें रक्षून । निर्गुण भजावें ॥ ७ ॥**

## स्मरण ( ३ )

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ ८ ॥

नित्य नेम प्रातःकाळीं । मध्यान्हकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्व काळीं । करीत जावें ॥ ९ ॥

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरूं नये ॥ १० ॥

**अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला ।**
**हालाहलापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥ ११ ॥**

## पादसेवन ( ४ )

**या नांव पादसेवन । जगद्गुरुपदीं अनन्य शरण ।**
**निरसावया जन्ममरण । यातायाती ॥ १२ ॥**

**सत्य पाहतां नाहीं असत्य । असत्य पाहतां नाहीं सत्य ।**
**सत्य असत्याचें कृत्य । पाहणारापाशीं ॥ १३ ॥**

**प्रगट असोनि नसे । गोप्य असोनी भासे ।**
**भासाभासाहून अनारिसे । गुरुगम्य मार्ग ॥ १४ ॥**

## अर्चन ( ५ )

पांचवी भक्ति तें अर्चन । अर्चन ह्मणजे देवतार्चन ।
यथासांग पूजा विधान । केलें पाहिजे ॥ १५ ॥
हरिहरांच्या अनंत मूर्ती । भगवंत जगदात्मा जगदीश मूर्ति
भगवंताच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ १६ ॥

**काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें आणि प्राणें ।**
**सद्भावें भगवदर्चनें । या नांव अर्चनभक्ति ॥ १७ ॥**
**ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी ।**
**मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वराची ॥ १८ ॥**
**मनें भगवंतासि पूजावें । कल्पून सर्वही समर्पावें ।**
**मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ १९ ॥**

## वंदन ( ६ )

साहावी भक्ति ते वंदन । करावे देवासि नमन ।
संत साधु आणि सज्जन । वंदीत जावे ॥ २० ॥
अनेक देवांसी नमस्कारिलें । तें एका भगवंतीं पावलें ।
यदर्थी वचन बोलिलें । आयका तें ॥ २१ ॥

**आकाशात्पतितं तोयम् यथा गच्छति सागरम् ।**
**सर्व-देव-नमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥**
**विशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।**
**आणि मुख्य परमेश्वर कृपा करी ॥ २२ ॥**

## दास्य ( ७ )

सातवें भजन दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।
सदा तत्परचि असावें । देव-सेवनीं ॥ २३ ॥

**देवाचें वैभव सांभाळावें । न्यून तें पडोंचि न द्यावें ।**
**चढतें वाढतें वाढवावें । पूजन देवाचें ॥ २४ ॥**

ऐशी हे सातवी भक्ति । निरूपिली यथामति ।
प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानस पूजा करावी ॥ २५ ॥

## सख्य ( ८ )

देवासी परम सख्य करावें । प्रेमप्रीतीनें बांधावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २६ ॥
देवास जयाची अत्यंत प्रीति । आपण वर्तावें तेणेंचि रीति ।
येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ २७ ॥

**सखा मानावा भगवंत । माता पिता गण गोत ।**
**विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळही परमात्मा ॥ २८ ॥**
**देवाच्या इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।**
**मग सहजचि भावें । कृपाळू देव ॥ २९ ॥**

## आत्मनिवेदन ( ९ )

ऐका निवेदनाचें लक्षण । देवास वहावें आपण ।
करावें तत्व विवरण । ह्मणजे कळे ॥ ३० ॥

**भक्त ह्मणजे विभक्त नव्हे । विभक्त ह्मणजे भक्त नव्हे ।**
**विचारेंवीण कांहींच नव्हे । समाधान ॥ ३१ ॥**

तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा ।
आपुला आपण शोध घ्यावा । अंतरामाजीं ॥ ३२ ॥

**आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्य भाव ।**
**या वचनाचा अभिप्राय । अनुभवी जाणाती ॥ ३३ ॥**

## भक्तीनें मुक्ति

ऐशी हे नवविधा भक्ति । केलिया पाविजे सायुज्यमुक्ति ।
सायुज्य मुक्तीस कल्पांतीं । चळण नाहीं ॥ ३४ ॥

काव्य नं. ८०६ ३१८१२८

अवघिया चार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती ।
त्यामध्यें तीन नासती । चौथी सायुज्य अविनाश ॥ ३५ ॥

पहिली मुक्ति ते सलोकता । दुसरी ते समीपता ।
तिसरी ते सरूपता । चौथी सायुज्यता मुक्ति ॥ ३६ ॥

निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होय सायुज्यता ।
सायुज्यता ह्मणजे एकरूपता । निर्गुण भक्ति ॥ ३७ ॥

रामदास

भक्ति ते सगुण भजन । ज्ञान तें निर्गुण चिंतन ।
भजन आणि चिंतन । एकाचेंची ॥ १ ॥

भजावें तयास चिंतावें । चिंतावें तेंचि भजावें ।
अनन्य भावें ओळखावें । आत्मरूप ॥ २ ॥

**निर्गुणास ओळखावें । परि सगुण संगोपावें ।**
**सज्ञान भक्तीनें वर्तावें । जीवलोकीं ॥ ३ ॥**

ऐसें दासबोधीं बोधिलें । तेंचि संक्षेपें कथिलें ।
एथ समर्थांचिया बोलें । दासानुदासें ॥ ४ ॥

हरि समर्थ.

## शार्दूल विक्रीडित

" भक्तीनें श्रवणें परीक्षिति करी, केलीं शुकें कीर्तनें,
प्रल्हाद स्मरणें, तदंघ्रिभजनें लक्ष्मी, पृथू पूजनें,
अक्रूरें मननास, दास्य कपिनें, तत्सख्य तें अर्जुनें,
केलें आत्मनिवेदनास बलिनें सर्वस्व कृष्णार्पणें. "

# प्रातःस्मरण.

## मंगलाचरण.

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । श्री गुरुभ्यो नमः
श्री वेदपुरुषाय नमः । इष्ट देवताभ्यो नमः । कुल देवताभ्यो नमः ।
श्री लक्ष्मी-नारायणाभ्यां नमः । श्री उमामहेश्वराभ्यां नमः । श्री मातापितृभ्यां नमः ।

## करदर्शनम्

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती । करमूले तु गोविंदः प्रभाते कर दर्शनम् ॥

## भूमिदर्शनम्

समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडले । विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥

## गणेशवंदनम्

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ॥

## गुरुवंदनम्

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः ॥
ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम्
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥

## विष्णुवंदनम्

शांताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशम् ।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ।
लक्ष्मीकांतं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥ १ ॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम् ॥ २ ॥
श्रीरामा पुरुषोत्तमा नरहरी नारायणा केशवा
गोविंदा गरुडध्वजा गुणनिधे दामोदरा माधवा
श्रीकृष्णा कमलापते यदुपते सीतापते श्रीपते
वैकुंठाधिपते चराचरपते लक्ष्मीपते पाहि माम् ॥ ३ ॥
रामाय रामभद्राय रामचंद्राय वेधसे
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥ ४ ॥
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहितायच
जगद्धिताय कृष्णाय गोविंदाय नमो नमः ॥ ५ ॥
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने
प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ॥ ६ ॥
वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम्
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ७ ॥
मंगलं भगवान् विष्णुर्मंगलं गरुडध्वजः
मंगलं पुंडरीकाक्षो मंगलायतनं हरिः ॥ ८ ॥

## स्नानविधिः

नमामि गंगे तव पादपंकजं, सुरासुरैर्वंदित दिव्यरूपम् ।
भुक्तिंच मुक्तिंच ददासि नित्यं, भावानुसारेण सदा नराणाम् ॥

## अर्घ्यविधिः

नमः कमलनाभाय नमस्ते जलशायिने !
नमस्ते केशवानन्त गृहाणार्घ्यं नमोस्तुते ॥
एहि सूर्य सहस्रांशो तेजोराशे जगत्पते ।
अनुकंपय मां भक्त्या गृहाणार्घ्यं नमोस्तुते ॥

## तर्पणम्

देवां स्तर्पयामि । ऋषींस्तर्पयामि । पितृंस्तर्पयामि ।

## भस्मधारणम्

ओम् नमः शिवाय । ओम् नमः शिवाय । ओम् नमः शिवाय ।

## संध्या-पूजा.

**ओम् । केशवाय नमः । नारायण नमः । माधवाय नमः ।
गोविंदाय नमः । विष्णवे नमः । मधुसूदनाय नमः ।
त्रिविक्रमाय नमः । वामनाय नमः । श्रीधराय नमः ।
हृषीकेशाय नमः । पद्मनाभाय नमः ! दामोदराय नमः ।
संकर्षणाय नमः । वासुदेवाय नमः । प्रद्युम्नाय नमः ।
अनिरुद्धाय नमः । पुरुषोत्तमाय नमः । अधोक्षजाय नमः ।
नारसिंहाय नमः । अच्युताय नमः । जनार्दनाय नमः ।
उपेंद्राय नमः । हरये नमः । श्रीकृष्णाय नमः ।**

## प्राणायाम-गायत्री

**ओम् । प्रणवस्य परब्रह्म ऋषिः परमात्मा देवता देवी
गायत्री छंदः । प्राणायामे विनियोगः ।
ओम् भूः ओम् भुवः ओम् स्वः ओम् महः ओम् जनः
ओम् तपः ओम् सत्यं ओम् तत्सवितुर्वरेण्यम्
भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ।
ओम् आपोज्योती रसोमृतं ब्रह्म भूः स्वरोम् ।**

## नमस्कारम्

श्रीमन्महागणधिपतये नमः । इष्ट देवताभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः । ग्रामदेवाताभ्यो नमः । वास्तु-देवताभ्यो नमः । सर्वेभ्यो देवेभ्यो नमः । आदित्यादि नवग्रहदेवताभ्यो नमः । मातृदेवतायै नमः । पितृ-देवतायै नमः । श्रीमन् भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणे द्वितीये

परार्धे विष्णुपदे श्री श्वेतवाराहकल्पे वैवस्वत-
मन्वंतरे कलियुगे प्रथम चरणे भरतवर्षे भरतखंडे
जंबूद्वीपे दंण्डकारण्ये देशे गोदावर्या दक्षिणे तीरे
शालिवाहन शके बौद्धावतारे राम क्षेत्रे अस्मिन्
वर्तमाने···नाम संवत्सरे···अयने···ऋतै···मासे···पक्षे
···तिथौ···वासरे···दिवस नक्षत्रे···राशिस्थिते चंद्रे···
राशिस्थिते सूर्ये···राशिस्थिते गुरौ शेषेषु ग्रहेषु
यथायथाराशिस्थितेषु सत्सु शुभ नाम योगे शिव करण
एवं गुण विशेषण विशिष्टायां शुभ पुण्य तिथौ मम आत्मनः
श्रुति-स्मृति-पुराणादि सकल शास्त्रोक्त फल प्रात्यर्थमस्माकं
सर्वेषां क्षेमस्थैर्यायुरोग्यैश्वर्याभिवृध्यर्थं समस्तं मंगलावाप्त्यर्थं
यथा ज्ञानेन यथा मिलितोपचारद्रव्यै ध्यानावाहनादि विविधो-
पचारै···देवता-पूजनं करिष्ये। तन्नादौ गणपति स्मरणं करिष्ये।

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा॥

## कलशपूजनम्

कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रितः।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाःस्मृता॥
कुक्षे तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा।
ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्यथर्वणाः॥
अंगैश्च सहिताः सर्वे कलशंतु समाश्रिताः।
अत्र गायत्री सावित्री शांतिः पुष्टिकरी तथा।
आयांतु देव पूजार्थं दुरितक्षयकारका,।
गंगेच यमुने चैव गोदावरि सरस्वति।
नर्मदे सिंधु कावेरी जलेऽस्मिन् संनिधं कुरु॥
वरुणाय नमः। सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।

## घंटापूजनम्

आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।
कुरु घंटा रवं तत्र देवताव्हानलक्षणम् ॥
घंटायै गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

## शंखपूजनम्

शंखादौ चंद्र दैवत्यं कुक्षौ वरुण देवता ।
पृष्ठे प्रजापतिश्चैव अग्रे गंगा सरस्वति ॥
त्रैलोक्ये यानि तीर्थांणि वासुदेवस्य चाज्ञया ।
शंखे तिष्ठंति विप्रेंद तस्मात् शंखं प्रपूजयेत् ॥
त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृतः करे ।
नमितः सर्व देवैश्च पांचजन्य नमो स्तु ते ॥
शंखाय नमः । सर्वोपचारार्थे गंधपुष्पं समर्पयामि ।

## दीपपूजनम्

भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्ययः ।
आरोग्यं देहि पुत्रांश्च सर्वार्थांश्च प्रयच्छ मे ॥
दीपदेवतायै नमः । सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

## पूजाद्रव्याणां आत्मनश्च प्रोक्षणम्

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपिवा ।
यः स्मरेत् पुंडरीकाक्षं स बाह्याभ्यंतरः शुचिः ॥

## अथध्यानम्

आगच्छ देवदेवेश तेजोराशि जगत्पते ।
क्रियमाणां मया पूजां गृहाण परमेश्वर ॥

## आवाहनम्

श्री⋯देवताभ्यो नमः । आवाहनार्थं पुष्पं समर्पयामि ।

## आसनम्

श्री···देवताभ्यो नमः । नानारत्नसमायुक्तं कार्तस्वरविभूषितं ।
आसनं देवदेवेश प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् । आसनार्थे तुलसीपत्रं समर्पयामि ।

## पाद्यम्

पाद्यं गृहाण देवेश सर्वक्षेमसमर्थ भो
भक्त्या समर्पितं देव लोकनाथ नमोस्तु ते
श्री···देवताभ्यो नमः । पाद्यं समर्पयामि ।

## अर्घ्यम्

नमस्ते देवदेवेश नमस्ते धरणीधर ।
नमस्ते जगदाधार अर्घ्यं नः प्रतिगृह्यताम् ॥

## आचमनीयम्

कर्पूरवासितं तोयं मंदाकिन्याः समाहृतम् ।
आचम्यतां जगन्नाथ मया दत्तं हि भक्तितः ॥
श्री···देवताभ्यो नमः । आचमनीयं समर्पयामि ।

## स्नानम्

गंगा सरस्वती रेवा पयोष्णी नर्मदा जलैः ।
स्नापितोसि मया देव तथा शांतिं कुरुष्व मे ॥
श्री···देवताभ्यो नमः । स्नानीयं समर्पयामि ।

## पंचामृत-स्नानम्

### पयःस्नानम्

पयो ददामि देवेश स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ।
कामधेनोः समुद्भूतं देवर्षिः पितृतृप्तिदम् ॥
श्री···देवताभ्यो नमः । पयः स्नानं समर्पयामि ।
तदन्तरेण शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।
सकल पूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

### दधि-स्नानम्

चंद्र मंडल सकाशं यत्सर्व देवप्रियं दधि ।
स्नानार्थं तन्मया दत्तं प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥
श्री…देवताभ्यो नमः । दधि स्नानं समर्पयामि ।
तदन्तरेण शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।
सकल पूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

### घृतस्नानम्

आज्यं सुराणांमाहारः आज्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।
आज्यं पवित्रं परमं स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ॥
श्री…देवताभ्यो नमः । घृतस्नानम् समर्पयामि ।
तदन्तरेण शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।
सकल पूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

### मधुस्नानम्

सर्वौषाधिसमुत्पन्नं पीयूषसदृशं मधु ।
स्नानार्थं ते प्रयच्छामि गृहाण परमेश्वर ॥
श्री… देवताभ्यो नमः । मधुस्नानं समर्पयामि ।
तदन्तरेण शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।
सकल पूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

### शर्करास्नाम्

इक्षुदंडसमुद्भूत दिव्य शर्करया प्रभो ।
स्नापयामि महाभक्त्या प्रीतो भव सुरेश्वर ॥
श्री…देवताभ्यो नमः । शर्करास्नानं समर्पयामि ।
तदन्तरेण शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।
सकल पूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।

### गंधोदकस्नानम्

कर्पूरैलासमायुक्तं सुगंधं द्रव्यसंयुतम् ।

गंधोदकं मया दत्तं स्नानार्थं प्रतिगृह्यताम् ॥
श्री···देवताभ्यो नमः । गंधोदक स्नानंसमर्पयामि ।
तदन्तरेण शुद्धोदक स्नानं समर्पयामि ।
सकल पूजार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **विलेपनार्थे चंदनं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **अलंकारार्थे अक्षतान्** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **पूजार्थे पुष्पं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **धूपम्** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **दीपम्** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **नैवेद्यं** समर्पयामि ।
प्राणाय स्वाहा, अपानाय स्वाहा, व्यानाय स्वाहा,
उदानाय स्वाहा, समानाय स्वाहा, ब्रह्मणे स्वाहा,
श्री···देवताभ्यो नमः । **मध्ये पानीयं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **उत्तरापोषणं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **हस्तप्रक्षालनं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **मुखप्रक्षालनं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **करोद्वर्तनार्थे चंदनं** समर्पयामि ।
श्री···देवताभ्यो नमः । **मुखवासार्थे पूगीफलतांबूलं** स० ।
श्री···देवताभ्यो नमः । **दक्षिणार्थे पुष्पं** समर्पयामि ।
**श्री···देवताभ्यो नमः । मंत्रपुष्पं समर्पयामि**
**अनेक पूर्वाराधनेन श्री···देवता प्रीयताम् ।**
**–उत्तरे निर्माल्य अभिषेक–स्नानं समर्पयामि–**
( पुरुष सूक्त–रुद्र–महिम्नस्तोत्र इ० स्तोत्रैः )

**वस्त्रम्**

सर्व भूषाधिके सौम्ये लोकलज्जा निवारणे ।
मयोपपादिते तुभ्यं वाससी प्रतिगृह्यताम् ॥
श्री···देवताभ्यो नमः । वस्त्रं समर्पयामि

## उपवीतम्

यज्ञोपवीतं परमंपवित्रं प्रजापतेस्तु सहजं पुरस्तात् ।
आयुष्यमग्रं प्रतिमंच शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ।
श्री···देवताभ्यो नमः । उपवीतम् समर्पयामि ।

## उत्तरीयम्

देवदेव नमस्ते स्तु त्राहि मां भवसागरात् ।
ब्रह्मसूत्रं सोत्तरीयं गृहाण पुरुषोत्तम ॥
श्री···देवताभ्यो नमः । उत्तरीयम् समर्पयामि ।

## हरिद्राकुंकुमादि भूषणानि.

हरिद्रा सर्व वर्णाभा सर्व सौभाग्यदायिनी
सर्वालंकार मुख्याहि देव त्वं प्रतिगृह्यताम् ॥
हरिद्राचूर्ण संयुक्तं कुंकुमं कामदायकम् ।
वस्त्रालंकरणं सर्वं देवित्वं प्रतिगृह्यताम् ॥
कज्जलं कामिकं रम्यं कामिनीकामसंभवम्
नेत्रयो भूषणार्थाय कज्जलं प्रतिगृह्यताम् ॥
उदितारुणसकाशं जपा कुसुम संनिभं
सीमंतभूषणार्थं सिंदूरं प्रतिगृह्यताम् ॥
मांगल्यतंतुमणिभि मुक्ताफल विराजितम् ।
कंठस्य भूषणार्थाय प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ॥
काचस्य निर्मितं द्रव्यं कंकणंच सुरेश्वरि
हस्तालंकरणार्थाय कंकणं प्रतिगृह्यताम् ॥
अलंकारान् मया देव सुवर्णेन विनिर्मितान्
प्रीत्यर्थं तव देवेश भूषणं प्रतिगृह्यताम् ॥
नाना भूषणार्थे अक्षतान् समर्पयामि ।

## ताडपत्रं

नानाभरण शोभाढ्यं नाना रत्नोपशोभितं ।
अर्पितं च मया देवि ताडपत्रं प्रतिगृह्यताम् ॥
। ताडपत्रं समर्पयामि ।

## परिमलद्रव्याणि

ज्योत्स्नापते नमस्तुभ्यं नमस्ते विश्वरूपिणे ।
नाना परिमल द्रव्यं गृहाण परमेश्वर ॥
। नाना परिमलद्रव्याणि समर्पयामि ।

## चंदनम्

श्रीखंडं चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् ।
विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ॥
। चंदनं समर्पयामि ।

## अक्षतान्

अक्षता स्तन्डुलाः शुभ्राः कुंकुमेन विराजिताः ।
मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वर ॥
। अक्षतान् समर्पयामि ।

## पुष्पाणि

माल्यादीनि सुगंधीनि माल्यादीनि वै प्रभो ।
मया हतानि पूजार्थं गृह्यतां परमेश्वर ॥
सेवंतिका बकुल चंपक पाटलाब्जैः ।
पुन्नाग जातिकरवीर रसालपुष्पैः ।
बिल्व प्रवाल तुलसीदल मालतीभिः ।
त्वां पूजयामि जगदीश्वर मे प्रसीद ॥
। पुष्पाणि समर्पयामि ।

( –सहस्र बिल्व–तुलसी–दुर्वांकुर– इ. समर्पयामि )

## धूपं

वनस्पति रसोद्भूतो गंधाढ्यो गंध उत्तमः ।
अघ्रेयः सर्व देवांना धूपो यं प्रतिगृह्यताम् ॥
। धूपं समर्पयामि ।

## दीपम्

आज्यं च वर्तिसंयुक्तं वन्हिना योजितं मया ।
दीपं गृहाण देवेश त्रैलोक्यतिमिरापह ॥
भक्त्या दीपं प्रयच्छामि देवाय परमात्मने ।
त्राहि मां निरयाद्धोराद्दीपज्योति नमोस्तु ते ॥
। दीपं समर्पयामि ।

## नैवद्यम्

नैवेद्यं गृह्यत्वं देव भक्ति मे ह्यचलां कुरु ।
ईप्सितं मे वरं देहि परत्र च परां गतिम् ॥
। नैवेद्यं समर्पयामि ।

प्राणाय स्वाहा । अपानाय स्वाहा । व्यानाय स्वाहा ।
उदानाय स्वाहा । समानाय स्वाहा । ब्रह्मणे स्वाहा ।
मध्येपानीयं समर्पयामि । उत्तरापोशनं समर्पयामि ।
हस्त प्रक्षालनं समर्पयामि । मुख प्रक्षालनं समर्पयामि ।
करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि ।

## तांबूलम्

पुगीफलं महद्दिव्यं नागवल्ली दलैर्युतम् ।
कर्पूरैला समायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम् ॥
। तांबूलम् समर्पयामि ।

## फलम्

इदं फलं मया देव स्थापितं पुरस्तव ।
तेन मे सुफलावाप्तिर्भवे जन्मनि जन्मनि ॥

फलेन फलितं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम्।
तस्मात्फल प्रदानेन सकलाश्च मनोरथाः ॥
। फलं समर्पयामि ।

## दक्षिणा

हिरण्यगर्भ गर्भस्थं हेम बीज विभावसोः
अंनतपुण्यफलदं अतः शांतिं प्रयच्छ मे ॥
। दक्षिणां समर्पयामि ।

## नीरांजनदीपम्

चंद्रादित्यौच धरणी विद्युदग्निस्तथैवच ।
त्वमेव सर्व ज्योतींषि आर्तिक्यं प्रतिगृह्यताम् ॥
श्री···देवताभ्यो नमः । नीरांजनदीपम् दर्शयामि ।

## कर्पूरार्तिक्यम्

कर्पूरगौरं करुणावरतारं संसारसारं भुजगेंद्र हारम्।
सदावसंतं हृदयारविंदं भवं भवानी सहितं नमामि ॥
श्री···देवताभ्यो नमः । कर्पूरार्तिक्यम् समर्पयामि ॥

( -आरती संग्रह पाहा- )

## प्रार्थना.

**घालिन लोटांगण वंदीन चरण, डोळ्यांनि पाहिन रूप तुझें ॥**
**प्रेमें आलिंगन आनंदे पूजिन, भावें ओवाळिन ह्मणे नामा ॥ १ ॥**
**त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥**
**कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वानुसृतिस्वभावात् ॥**
**करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥**

अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥
नारायण हरे नारायण हरे नारायण हरे नारायण ॥ ५ ॥

## प्रदक्षिणा

यानि कानिच पापानि जन्मजन्मांतरकृतानिच ।
तानि तानि विनश्यंति प्रदक्षिण पदे पदे ॥

## साष्टांगनमस्कारः

नमः सर्व हितार्थाय जगदाधार हेतवे ।
साष्टांगोयं प्रणामस्ते प्रयत्नेन मया कृतः ॥
नमोस्तु अनंत्ताय सहस्रमूर्तये सहस्र पादाक्षि शिरोरु बाहवे ।
सहस्र नाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटि युगधारिणे नमः ॥

## मंत्रपुष्पम्

ॐयज्ञेनयज्ञमयजंतदेवास्तानिधर्माणिप्रथमान्यासन्
तेहनाकंमहि मानःसचंत यत्र पूर्वेसाध्यास्सन्तिदेवाः ।
ॐराजाधिराजायप्रसह्यसा हिने नमो वयंवैश्रवणायकुर्महे
समेकामान्कामकामायमह्यंकामेश्वरोवैश्रवणोददातु
कुबेरायवैश्रवणाय महाराजायनमः ॥ ॐस्वस्तिसाम्राज्यं
भौज्यंस्वाराज्यंवैराज्यंपारमेष्ठ्यंराज्यंमहाराज्यमाधिपत्य-
मयंसमंतपर्या ईस्यात्सार्वभौमःसार्वायुषांतादापरार्धात्
पृथिव्यैसमुद्रपर्यंतायाएक राळिति । तदप्येषःश्लोकोभिगी-
तोमरुतःपरिवेष्टारोमरुत्तस्यावसन्गृहे आविक्षितस्य-
कामप्रेर्विश्वेदेवाःसमासदइति ॥

## प्रार्थनापूर्वकनमस्कारः

करचरणकृतं वा कायजं कर्मजं वा।
श्रवणनयनजं वा मानसं वापराधम्।
विहितमविहितं वा सर्वमेतत् क्षमस्व।
जय जय करुणाब्धे श्री भवानीश शंभो॥
आवाहनं न जानामि न जानामि विसर्जनम्।
पूजांचैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर॥
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर।
यत्पूजनं कृतं देव परिपूर्णं तदस्तु मे॥
रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि।
पुत्रान् देहि धनं देहि सर्वान्कामांश्च देहि मे॥
यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपः पूजाक्रियादिषु।
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम्॥
अनेन मया यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः
कृतपूजनेन श्री···देवता प्रीयंताम्

पुंडलीक वरदे हरि विठ्ठल।
सीताकांतस्मरण जय जय राम
पार्वतीपते हर हर महादेव
श्री गुरु देव दत्त.

---

## तीर्थग्रहणम्

अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम्
विष्णुपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम्॥

---

## भूपाळ्या.

### भूपाळी गणपतीची.

उठा उठा हो सकाळिक ॥ वाचे स्मरावा गजमुख ॥
सिद्धिबुद्धीचा नायक ॥ सुखदायक भक्तांसी ॥ १ ॥
आंगीं शेंदुराची उटी ॥ माथां शोभतसे कीरिटी ॥
केशर कस्तुरी ललाटीं ॥ कंठीं हार साजिरा ॥ २ ॥
कानीं कुंडलांची प्रभा ॥ चंद्रसूर्य जैसे नभा ॥
माजी नागबंदी शोभा ॥ स्मरतां उभा जवळी तो ॥ ३ ॥
कासे पितांबराचीघटी ॥ हातीं मोदकांची वाटी ॥
रामानंद स्मरतां कंठी ॥ तो संकटीं पावतो ॥ ४ ॥

### भूपाळी श्रीरामाची.

उठोनियां प्रातःकाळीं । जपा रामनामावळी ।
स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैलबाळी समवेत ॥ ध्रु ॥
राम योग्याचें मंडण । राम भक्तांचें भूषण ।
राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासाचें ॥ १ ॥
रामें ताटिका मारिली । रामें शिळा उद्धरिली ।
रामें जानकी पर्णिली । गणिका केली ती मुक्त ॥ २ ॥
रामें पाषाण तारिले । रामें दैत्य संहारिलें ।
रामें बंदी सोडविलें । मुक्त केले सुरवर ॥ ३ ॥
रामें रक्षिलें भक्तांसी । रामें सोडविलें देवांसी ।
राम दासाचे मानसीं । रामदासीं आनंद ॥ ४ ॥

### भूपाळी पंढरीची.

उठा उठा हो वेगेंसी । चला जाऊं पंढरिसी ।
भेटों विठ्ठलरखुमाईसी । त्रिविधताप हरतील ॥ ध्रु० ॥

चंद्रभागे करूं स्नान । घेऊं पुंडलिकाचें दर्शन ।
तेथें भेटति संतजन । तेणें मन निवेल ॥ १ ॥
गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागीरथी ।
तुंगभद्रा भोगावती । येती श्रीपतिदर्शना ॥ २ ॥
तापी नर्मदा कावेरी । पंचगंगा गोदावरी ।
स्नानें केलिया बोहरी । महादोष हरतील ॥ ३ ॥
रामानंदाचें माहेर । क्षेत्र नाम पंढरपूर ।
माता पिता विश्वंभर । पैलपार तरतील ॥ ४ ॥

### भूपाळी श्रीकृष्णाची

ऊठ गोपाळजी ! जाय धेनूकडे ।
पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥
लोपली हे निशी मंद झाला शशी ।
मुनिजन मानसीं ध्याति तुजला ॥ १ ॥
भानु उदयाचळीं तेज पुंजाळलें ।
विकसती कमळें जळामाजी ॥ २ ॥
धेनुवत्सें तुला बाहती माधवा ।
ऊठ गा यादवा ! उशिर झाला ॥ ३ ॥
ऊठ पुरुषोत्तमा ! वाट पाहे रमा ।
दावि मुखचंद्रमा सकळिकांसी ॥ ४ ॥
कनकपत्रांतरीं दीपरत्नें बरीं ।
ओवाळिती सुंदरी तूजलागीं ॥ ५ ॥
जन्मजन्मांतरीं दास होऊं हरी ।
बोलती वैखरी भक्त तूझे ॥ ६ ॥
कृष्णकेशव करीं चरणांबुज धरी ।
ऊठ गा श्रीहरी मायबापा ॥ ७ ॥

## भूपाळी घनश्यामसुंदराची

घनश्यामसुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ।
उठिं लवकरि वनमाळी ! उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥
सायंकाळीं एके वेळीं द्विजगण अवघे वृक्षीं ।
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण-दक्षी ।
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं ।
यमुनाजळासि जाति मुकुंदा ! दध्योदन भक्षीं ॥
मुक्तता होऊं पाहे । कमळिणीपासुनीयां भ्रमरा ।
पूर्वदिशे मुख धुतलें । होतसे नाश तिमिरा ॥
उठिं लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा ।
मुखप्रक्षालन करीं अंगिकारीं भाकरकाला ॥ १ ॥
घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती ।
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाती ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालूं पाहती ।
आनंदकंदा ! प्रभात झाली उठ सरली राती ॥
काढीं धार क्षीरपात्री घेउनी धेनू हंबरती ।
द्वारीं उभे गोपाळ तुजला हांक मारुनि बाहती ॥
हे सुमनहार कंठीं । घालिं या गुंजमाळा ।
हातीं वेत्रकाष्ठ बरवें । कांवळा घेईं काळा ॥
ममात्मजा मधुसूदना हृषीकेशि जगत्पाळा ।
हंबरताति वासरें, धेनु स्तन-पान्हा आला ॥ २ ॥

प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती ।
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभीती ॥
प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती ।
अर्घ्यदान देउनियां द्विजजन देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णु-पूजा समर्पिती ।
स्मार्त शिवार्चनसक्त, शक्तितें शाक्त आराधिती ॥
ऋषिगण आश्रमवासी । जे निरंजनीं धाले ।
अरुणोदय होतांचि । आपुले ध्यानीं मग्न झाले ॥
पंचपंच-उषः कालीं । रविचक्र निघों आलें ।
एवढा वेळ निजलासि ह्मणुनि हरि कळेल नंदाला ॥ ३ ॥

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं ।
अध्यापन गुरु करिति शिष्यही अध्ययना उदयीं ॥
याज्ञिकजन यज्ञकुंडिं आहुती टाकिताति पाहीं ।
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे सांवळे पाडसे । उठिं कृष्णाबाई ।
सिद्ध सवें बळीराम घेउनी गोधनें वना जाई ॥
मुनिजनमानसहंसा । गोपीमनःकमलभृंगा ।
मुरहर पंकजपाणी । पद्मनाभ श्रीरंगा ।
शकटांतक सर्वेशा । हे हरि प्रतापतुंगा ।
कोटिरवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला ।
होनाजी-बाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥ ४ ॥

## आरती संग्रह



सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ॥
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची ॥
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥

जय देव जय देव जय मंगळमूर्ती ॥
दर्शनमात्रें मनकामना पुरती ॥ ध्रु० ॥
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ॥
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥
हिरेजडित मुगुट शोभतो बरा ॥
रुणझुणती नूपुरें चरणी घागरिया ॥ जय० ॥२॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ॥
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना ॥
संकटीं पावावें-निर्वाणीं रक्षावें-सुरवरवंदना ॥
जय देव जय देव जय मंगळमूर्ती ॥ दर्शनमात्रें० ॥३॥

(२)

नानापरिमळ दुर्वा शेंदुर शमिपत्रें ॥
लाडू मोदक अन्नें परिपूरित पात्रें ॥
ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रें ॥
अष्टहि सिद्धि नवनिधि देसी क्षणमात्रें ॥ १ ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥
तूझे गुण वर्णाया मज कैंची स्फूर्ती ॥ जय० ॥ धृ० ॥
तुझें ध्यान निरंतर जे कोणी करिती ॥
त्यांचीं सकलहि पापें विघ्नेंही हरती ॥
वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ॥
सर्वहि पावुनि अंतीं भवसागर तरती ॥ जय देव० ॥२॥
शरणागत सर्वस्वें भजती तव चरणीं ॥
कीर्ति तयांची राहे जोंवर शशितरणी ॥
त्रैलोक्यी ते विजयी अद्भुत हे करणी ॥
गोसावीनंदन रत नामस्मरणीं ॥
॥ जय देव जय देव० ॥ ३ ॥

( ३ )

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ॥
दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको ॥
हात लिये गुडलड्डू सांई सुरवरको ॥
महिमा कहे न जाये लागत हूं पदको ॥ १ ॥
जय जय जी गणराज विद्यासुखदाता ॥
धन्य तुमारा दर्शन मेरा मन रमता ॥ धृ ॥
अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरी ॥
बिघनबिनाशक मंगलमूरत अधिकारी ॥
कोटीसुरजप्रकाश ऐसी छब तेरी ॥
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबहारी ॥ जय० ॥ २ ॥
भावभगतिसे कोई शरणागत आवे ॥
संतत संपत् सबही भरपूर पावे ॥
ऐसे तुम महाराज मोंको अतिभावे ॥
गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ॥ जय० ॥ ३ ॥



## आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा ॥
वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ॥
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळां ॥ १ ॥

जय देव जय देव जय श्रीशंकरा ॥
आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ ध्रु० ॥
कर्पुरगौरा भोळा नयनीं वीशाळा ॥
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा ॥
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ जय० ॥ २ ॥

देवीं दैत्यीं सागर मंथन पैं केलें ॥
त्यामाजी अवचीत हळाहळ उठिलें ॥
तें त्वां असुरपणें प्राशन केलें ॥
नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥ जय० ॥ ३ ॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ॥
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी ॥
रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा० ॥ ४ ॥

## ( २ )

## आरती त्र्यंबकेश्वराची

जय जय त्र्यंबकराज गिरिजानाथा गंगाधरा हो ॥
त्रिशूळपाणि शंभो नीलग्रीवा शशिशेखरा हो ॥
वृषभारूढ फणिभूषण दशभुज पंचानन शंकरा हो ॥
विभूतिमाळा जटासुंदरगजचर्मांबरधरा हो ॥ ध्रु० ॥

पडलें गोहत्येचें पातक गौतमऋषिच्या शिरीं हो ॥
त्यानें तप मांडिलें ध्याना आणुनि तुज अंतरीं हो ॥
प्रसन्न होउनि त्यातें स्नाना दिधली गोदावरी हो ॥
औदुंबरमुळिं प्रकटे पावन त्रैलोक्यातें करी हो ॥ जय० ॥१॥

धन्य कुशावर्ताचा महिमा वाचे वर्णूं किती हो ॥
आणिकही बहु तीर्थें गंगाद्वारादिक पर्वतीं हो ॥
वंदन मार्जन करिती त्यांचे महा-दोष नासती हो ॥
तुझिया दर्शनमात्रें प्राणी मुक्तीतें पावती हो ॥ जय० ॥ २ ॥

ब्रह्मगिरीची भावें ज्याला प्रदक्षिणा जरि घडे हो ॥
तें काया कष्टे जंव जंव चरणीं रुपती खडे हो ॥
तंव तंव पुण्यविशेषें किल्मिष अवघें त्यांचें झडे हो ॥
केवळ तो शिवरूपी काळ त्याच्या पायां पडे हो ॥ जय० ॥ ३ ॥

लावुनियां निजभजनीं सकळहि पुरविसी मनकामना हो ॥
संतति संपत्ति देसी अंतीं चुकविसि यमयातना हो ॥
शिव शिव नाम जपतां वाटे आनंद माझ्या मना हो ॥
गोसावीनंदन विसरे संसारयातना हो ॥ जय जय० ॥ ४ ॥

श्रीकृष्णाय नमः



आरती आरती करूं गोपाळा ॥
मीतूंपण सांडोनी वेळोवेळां ॥ धृ० ॥

आवडीं गंगाजळें देवा न्हाणिलें ॥
भक्तीचें भूषण प्रेमसुगंध अर्पिलें ॥
अहं हा धूप जाळूं श्रीहरिपुढें ॥
जंव जंव धूप जळे तंव तंव देवा आवडे ॥ आर० ॥ १ ॥

रमावल्लभदासें सोहंधूप जाळिला ॥
एका आरतीचा मग प्रारंभ केला ॥
सोहं हा दीप ओवाळूं गोविंदा ॥
समाधी लागली पाहतां मुखारविंदा ॥ आर० ॥ २ ॥

हरिखें हरिख होतो मुख पाहतां ॥
प्रगटल्या ह्या नारी सर्वही अवस्था ॥
सद्भावालागीं अहं हा देव भुकेला ॥
रमावल्लभदासें अहं नैवेद्य अर्पिला ॥ आर० ॥ ३ ॥

फल तांबूल दक्षिणा अर्पिली ॥
तया उपर नीरांजनें मांडीलीं ॥
पंचप्राण पंचज्योति आरती उजळली ॥
विश्व हें लोपलें तया प्रकाशातळीं ॥ आर० ॥ ४ ॥

आरतीप्रकाशें चंद्रसूर्य लोपले ॥
सुरवर नभीं तेथें तटस्थ ठेले ॥
देवभक्तपण न दिसे कांहीं ॥
ऐशापरि दास रमावल्लभापायीं ॥ आर० ॥ ५ ॥

## श्रीरामाची आरती

उत्कट साधुनि शिळा सेतू बांधोनि ।
लिंगदेहलंकापुर विध्वंसूनी ।
कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी ।
देह-अहंभाव-रावण निवटूनी ॥ १ ॥

जय देव जय देव जय निजबोधा रामा ।
परमार्थें आरती, सद्भावें आरती, परिपूर्णकामा ॥ ध्रु ॥

प्रथम सिताशुद्धी हनुमंत गेला ।
लंकादहन करुनी आखया मारीला ।
मारीला जंबूमाळी भुवनिं त्राहाटीला ।
आनंदाची गूढी घेउनियां आला ॥ २ ॥

निजबळें निजभक्ती सोडवीली सीता ।
ह्मणुनी येणें झालें अयोध्ये रघुनाथा ।
आनंदें वोसंडे वैराग्य भरता ।
आरति घेउनि आली कौसल्यमाता ॥ ३ ॥

अनुहतध्वनी गर्जति अपार।
अठरापद्मे वानर करिती भुभुःकार।
अयोध्येसी आले दशरथकुमर।
नगरीं होत आहे आनंद थोर ॥ ४ ॥

सहजसिंहासनीं राजा रघुवीर।
सोहंभावें तया पूजाउपचार।
सहजाची आरती वाद्यांचा गजर।
माधवदासा स्वामी आठव ना विसर ॥ ५ ॥

आरती अनंताची ( आवडी गंगाजळें या चा० )

जय श्रीअनंता लक्ष्मीकांता आरति ओवाळूं ॥
भक्तां संकट पडतां धांवे अनंत कनवाळूं ॥ धृ ॥

भाद्रपदमासीं शुक्ल चतुर्दशी तव व्रत नेमानें ॥
दुकूलदोरक करुनी पुजिती अनंत नामानें ॥ १ ॥

नानापरिचीं पुष्पें द्रव्यें तुजला अर्पीती ॥
षोडशपूजा करुनी ब्राह्मण संतर्पण करिती ॥ २ ॥

अपूपवायन दंपतिपूजन त्या दिवशीं करिती ॥
अनंत संतुष्टोनि देतो संतति संपत्ती ॥ ३ ॥

राया धर्में आचरितां व्रत क्लेशांतुनि सुटला ॥
कौंडिण्यानें पुजितां तुजला उद्धरिलें त्याला ॥ ४ ॥

मोरेश्वरसुत वासुदेव हा तिष्ठत सेवेसी ॥
संकटकाळीं रक्षि अनंता आपुल्या दासासी ॥ ५ ॥

श्री गोपालकृष्णाय नमः



अवतार गोकुळीं हो ॥ जन तारावयासी ॥
लावण्यरूपडें हो ॥ तेजःपुंजाळ राशी ॥
उगवलें कोटिबिंब ॥ रवि लोपला शशी ॥
उत्साह सुरवरां ॥ महाथोर मानसीं ॥ १ ॥

जय देवा कृष्णनाथा ॥ राईरखुमाईकांता ॥
आरती ओंवाळीन ॥ तुह्मां देवकीसुता ॥ धृ ॥
कौतुक पहावया ॥ माव ब्रह्मयानें केली ॥
वत्सेंही चोरुनियां ॥ सत्यलोकासी नेलीं ॥
गोपाळ गाई वत्सें ॥ दोहीं ठायीं रक्षिलीं ॥
सुखाचा प्रेमसिंधू ॥ अनाथांची माउली ॥ २ ॥

चारितां गोधनें हो ॥ इंद्र लोपला भारी ॥
मेघ जो कडाडीला ॥ शिळा वर्षल्या धारीं ॥
रक्षिलें गोकुळ हो ॥ नखिं धरिला गिरी ॥
निर्भय लोकपाळ ॥ अवतरला हरी ॥ ३ ॥

वसुदेव देवकीचे ॥ बंदीं फोडिली शाळ
होउनियां विश्वजनिता ॥ तया पोटींचा बाळ ॥
दैत्य हे त्रासियेले ॥ समूळ कंसासी काळ ॥
राज्य हें उग्रसेना ॥ केला मथुरापाळ ॥ ४ ॥

तारिले भक्तजन ॥ दैत्य सर्व निर्दाळून ॥
पांडवां साहाकारी ॥ अडलिया निर्वाणीं ॥
गुण मी काय वर्णू ॥ मति केवळी वाणी ॥
विनवी दास तुका ॥ ठाव मागे चरणीं ॥
जय देवा कृष्णनाथा ॥ ५ ॥

२

ओंवाळूं आरती मदनगोपाळा ॥
श्याम सुंदर गळां वैजयंतीमाळा ॥ ध्रु० ॥

चरणकमल ज्याचे अति सुकुमार ॥
ध्वजवज्रांकुश ब्रीदांचे तोडर ॥ १ ॥

नाभिकमलीं ज्याचे ब्रह्मयाचें स्थान ॥
हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन ॥ २ ॥

मुखकमळ पाहतां सूर्याच्या कोटी ॥
मोहियलें मानस कोंदियेली दृष्टी ॥ ३ ॥

जडितमुगुट ज्याचा देदीप्यमान ॥
तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ॥ ४ ॥

एका जनार्दनीं देखियलें रूप ॥
रूपचि पाहतां अवघें झालें तद्रूप ॥ ५ ॥

## आरती भुवनसुंदराची

आरती भुवनसुंदराची । इंदिरावरा मुकुंदाची ॥ ध्रु ॥
पद्मसम पादयुग्मरंगा । ओंवाळणी होति भृंगा ॥
नखमणि स्रवताहे गंगा । जे कां त्रिविधतापभंगा ॥
वर्तुल गुल्फ भ्राजमानें । किंकिणिक्वणित नाद घणघणित
वांकिवर झुणित नूपुरें झनन मंजिराची ॥
झनन ध्वनी मंजिराची । आरती भुवन० ॥ १ ॥

पीतपट हटकतसवर्णी । कांची नितंब सुस्थानीं ॥
नाभिची अगाध हो करणी । विश्वजनकाची जे जननी ॥
त्रिवलीललित उदरशोभा । कंबुगलां माळ विलंबित
झळाळ कौस्तुभ सरळ बाहु श्रीवत्सतरलमणिमरळ कंकणाची
प्रीति बहु जडित कंकणाची । आरती भुवन० ॥ २ ॥

इंदुसम आस्य कुंदरदना । अधरारुणार्क बिंबवदना ॥
पाहतां भ्रांति पडे मदना । सजलमेघाब्धि दैत्यदलना ॥
झळकत मकरकुंडलाभा । कुटिलकुंतलीमयूरपत्रावली
वेष्टिले तिलक भाळिं केशरी झळाळित कृष्णकस्तुरीची ॥
अक्षता काळी कस्तुरीची । आरती भुवन० ॥ ३ ॥

कल्पद्रुमातळीं मूर्ती । सौदामिनी कोटिदीप्ती ॥
गोपीगोपवलय भंवती । त्रिविष्टप पुष्पवृष्टि करिती ॥
मंजुळ मधुर मुरलिनादें । थकित गंधर्व चकित अप्सरा
सुरागिरिधरा कर्धुरधरा रतीनें प्रेमयुक्त साची ॥
आरती ओंवाळित साची । आरती भुवन० ॥ ४ ॥

वृंदावनींचिये हरणीं । सखे गे कृष्ण माय बहिणी ॥
श्रमलों भवाब्धिचे फिरणीं । आतां मज ठाव देई चरणीं ॥
अहा हे पूर्ण पुण्यश्लोका । नमितों चरण शरण मी करुणा
येऊं दे विनाणपाणी कृष्ण नेणतें बाळ आपलें राखि लाज याची
दयानिधे राखि लाज याची । आरती भुवन० ॥ ५ ॥

## आरती दशावतारांची

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥
भक्तसंकटीं नानास्वरूपीं स्थापिसि स्वधर्म ॥ धृ० ॥
अंबऋषीकारणें गर्भवास सोशीसी ॥
वेद नेले चोरुनि ब्रह्मया आणुनियां देसी ॥

मत्स्यरूपी नारायण सप्तहि सागर धुंडीसी ॥
हस्त लागतां शंखासुरा तुझा वर देसी ॥ आरती० ॥ १ ॥

रसातळासी जातां पृथ्वी पाठीवर घेसी ॥
परोपकाराकारणें देवा कांसव झालासी ॥
दाढे धरुनि पृथ्वी नेतां वराहरूप होसी ॥
प्रऱ्हादाकारणें स्तंभीं नरहरि गुरगुरसी ॥ आरती० ॥ २ ॥

पांचवे अवतारीं बळिच्या द्वाराला जासी ॥
भिक्षे स्थल मागुनी बळीला पाताळा नेसी ॥
सर्व समर्पण केलें ह्मणउनि प्रसन्न त्या होसी ॥
वामनरूप धरुनि बळिच्या द्वारीं तिष्ठसी ॥ आरती० ॥ ३ ॥

सहस्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला ॥
कष्टी ते रेणुका ह्मणुनी सहस्रार्जुन वधिला ॥
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्रांला ॥
सहावा अवतार परशुराम प्रगटला ॥ आरती० ॥ ४ ॥

मातला रावण सर्वां उपद्रव केला ॥
तेहतिस कोटी देव बंदीं हरिलें सीतेला ॥
पितृवचनालागीं रामें वनवास केला ॥
मिळोनि वानर सहित राजाराम प्रगटला ॥ आरती० ॥ ५ ॥

देवकीवसुदेव बंदीमोचन त्वां केलें ॥
नंदाघरीं जाउनि निजसुख गोकुळा दिधलें ॥
गोरसचोरी करितां नवलक्ष गोपाळ मिळविले ॥
गोपिकांचें प्रेम देखुनि श्रीकृष्ण भुलले ॥ आरती० ॥ ६ ॥

बौद्ध कलंकी कलियुगीं झाला अधर्म हा सगळा ॥
सांडुनि नित्यधर्म सोडुनि हरिचें नाम कलिच मातला ॥ ७ ॥

## श्री हनुमते नमः



सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं ॥
करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥
गडबडिलें ब्रह्मांड धाकें त्रिभुवनीं ॥
सुर नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥ १ ॥
जय देव जय देव जय हनुमंता ॥
तुमचेनी प्रसादें न भीं कृतांता ॥ धृ० ॥
दुमदुमलीं पाताळें उठिला प्रतिशब्द ॥
थरथरला धरणीधर मानीला खेद ॥
कडकडिले पर्वत उड्डुगण उच्छेद ॥
रामी रामदासा शक्तीचा बोध ॥
जय देव जय देव० ॥ २ ॥

## श्री सत्यनारायण नमः

आरती सत्यदेव प्रभुची । मनोरथ पूर्ण करी त्याची ॥
साधु नवस करी तुजला, । कन्या रत्न देशी त्याला ।
धरोनि द्रव्य लोभ देवा । करीना दुष्ट तुझी सेवा ।
झाले क्लेश फार त्याला । अर्थ सर्वही व्यर्थ जाय तें ।
कृपण फार तो शरण येउनी, । चरण वंदितां,
कृपा पूर्ण साची ॥ आरती० ॥

साधु सुता प्रसादा ती । विसरुनि जाय पति भेटी ।
आला कोप तुह्मां देवा । नौका जळीं बुडे तेव्हां ।
महिमा असा प्रसादाचा । महिमा असा प्रसादाचा ॥ चाल ॥
देव बाणिला ऐकुनि कानीं । त्वरित धावुनि,
गृहा येऊनी, प्रसाद घेतां । निघे वरी त्याची,
नौका निघे वरी त्याची, ॥ आरती० ॥

भक्तीयुक्त करूं पूजा । भरंवसा पूर्ण आह्मां तूझा ।
नाहीं दुजा देव ऐसा । इच्छित वस्तु देई दासा ।
ऐकूं कथा तुझी भावें । ऐकूं कथा तुझी भावें ॥ चाल ॥
गोड सुधेहुनि, फार लागते । दुःख हारिते ।
पार दाविले । भवाब्धिचा जी, त्र्यंकटेश कविची ।
कविता त्र्यंकटेश कविची ॥ आरती० ॥

### आरती सत्यनारायणाची



जय जय दीनदयाळा सत्यनारायण देवा ॥
पंचारति ओंवाळूं श्रीपति तुज भक्तिभावा ॥ जय० ॥ धृ० ॥
विधियुक्त पुजुनि करिती पुराण श्रवण ॥
परिमळद्रव्यासहित पुष्पमाळा अर्पून ॥

घृतयुक्तशर्करामिश्रित गोधूमच्चूर्ण ॥
प्रसाद भक्षण करितां तूं त्यां प्रसन्न नारायण ॥ जय० ॥ १ ॥

शतानंदे विप्रें पूर्वी व्रत हें आचरिलें ॥
दरिद्र दवडुनि अंती त्यातें मोक्षपदा नेलें ॥
त्यापासुनि हें व्रत या कलियुगीं सकळां श्रुत झालें ॥
भावार्थें पूजितां सर्वां इच्छित लाधलें ॥ जय० ॥ २ ॥

साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थीलें ॥
इच्छित पुरतां मदांध होउनि व्रत न आचरिलें ॥
त्या पापानें संकटिं पडुनी दुःखहि भोगिलें ॥
स्मृति होउनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ॥जय०॥३॥

प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ॥
क्षोभ तुझा होतांचि तयाची नौका बूडाली ॥
अंगध्वजरायासी यापरि दुःखस्थिति आली ॥
मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णीं परिसीली ॥ जय० ॥ ॥ ४ ॥

पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ॥
पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ॥
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनी ॥
ऐसा भक्तां संकटीं पावसि तूं चक्रपाणी ॥ जय० ॥ ५ ॥

अनन्यभावें पूजुनि हें व्रत जे जन आचरती ॥
इच्छित पुरविसि त्यांतें देउनि संतति संपत्ती ॥
संहरती भय दुरितें सर्वहि बंधनें तुटती ॥
राजा रंका समान मानुनि पावसि श्रीपति ॥ जय० ॥ ६ ॥

ऐसा तव व्रतमहिमा अपार वर्णूं मी कैसा ॥
भक्तिपुरःसर आचरती त्यां पावसि जगदीशा ॥
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा ॥
मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ॥ जय० ॥ ७ ॥

श्री विठ्ठलाय नमः



युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥
वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलेगा ॥
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥
जय देव जय देव जय पांडुरंगा ॥
रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥ज.॥ ध्रु.॥
तुळसीमाळा गळां कर ठेउनि कटीं ॥
कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ॥
देव सुरवर नित्य येती भेटी ॥
गरुड हनूमंत पुढें उभे रहाती ॥ ज० ॥ २ ॥
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ॥
सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥
राई रखुमाबाई राणी या सकळा ॥
ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ ज० ॥ ३ ॥
धन्य पुष्पावती भीमासंगम ॥
धन्य वेणूनाद उभें परब्रह्म ॥
धन्य पुंडलीक भक्त निर्वाण ॥
यात्रेसी येताती साधु सज्जन ॥ ४ ॥
ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती ॥
चंद्रभागेमाजी सोडुनियां देती ॥

दिंड्या पताका वैष्णव नाचती ॥
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ज० ॥ ५ ॥
आषाढी कार्तिकीं भक्तजन येती ॥
चंद्रभागेमध्यें स्नानें जे करिती ॥
दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती ॥
केशवासी नामदेव भावें ओंवाळीती ॥ जय० ॥ ६ ॥

(२)

येईं हो विठ्ठले माझे माउलिये ॥
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें ॥ ध्रृ० ॥
आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ॥
पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥ येईं० ॥ १ ॥
पिंवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ॥
गरुडावरि बैसून माझा कैवारी आला ॥ येईं० ॥ २ ॥
विठोबाचें राज्य आह्मां नित्य दिपवाळी ॥
विष्णुदास नामा जीवेंभावें ओवाळी ॥ येईं हो० ॥ ३ ॥

श्री दत्ताय नमः



आरती दत्तात्रयप्रभुची । करावी सद्भावें त्याची ॥ ध्रु० ॥
श्रीपदकमळा लाजविती । वर्तुल गुल्फ रम्य दिसती ॥
कटिस्थित कौपिन ती वरती । छाटी अरुणोदय परि ती ॥ चाल ॥
वर्णूं काय तिची लीला । हीच प्रसवली ॥
मिष्ट अन्न बहु । तुष्टाचे झाले ॥

ब्रह्म क्षत्र आणि। वैश्य शूद्रही ॥
सेवुनियां जोची। अभिरुची से०। आरती० ॥ १ ॥
गुरुवर सुंदर जगजेठी। ज्याचे ब्रह्मांडें पोटीं ॥
माळा अवलंबित कंठीं। बिंबफळ वर्ण रम्य ओष्ठीं ॥ चाल ॥
अहा ती कुंदरदनशोभा। दंड कमंडलु ॥
शंखचक्र करिं। गदापद्म धरि ॥
जटामुगुट परि। शोभतसे ज्याची ॥
मनोहर शो०। आरती० ॥ २ ॥
रुचिरा सौम्य युग्मदृष्टीं। जिनें द्विज तारियला कुष्ठी ॥
दरिद्रें ब्राह्मण बहु कष्टी। केला तिनेंच संतुष्टी ॥ चाल ॥
दयाळा किती ह्मणुनी वर्णूं। वंध्या वृद्धा ॥
तिची सुश्रद्धा। पाहुनि विबुधची ॥
पुत्ररत्न जिस। देउनियां सतिची ॥
इच्छा पुरविली मनिंची। आरती० ॥ ३ ॥
देवा अघटित तव लीला। रजकहि चक्रवर्ति केला ॥
दावुनि विश्वरूप मुनिला। द्विजोदरशूल पळें हरिला ॥ चा० ॥
दुमविली वांझ महिषि एक। निमिषामाजीं ॥
श्रीशैल्याला। तंतुक नेला ॥
पतिताकरवीं। वेद वदविला ॥
महिमा अशी ज्याची। स्मराहो महिमा अशी ज्याची ॥
आरती० ॥ ४ ॥
वळखुनि शूद्रभाव चित्तीं। दिधलें पीक अमित शेतीं ॥
भूसुर एक शुष्क वृत्ती। क्षणार्धें धनद तया करिती ॥ चा० ॥
ज्याची अतुल असे करणी। नयन झांकुनी ॥
सर्वं उघडितां। नेला काशिस ॥
भक्त पाहतां। वार्ता अशी ज्याची ॥
स्मरा हो वार्ता अशी ज्याची ॥ आरती० ॥ ५ ॥

दयाकुल औदुंबरिं मूर्ती । नमितां होय शांतवृत्ती ॥
न देती जनन मरण पुढती । सत्य हें न धरा मनिं भ्रांती ॥ चा० ॥
सनातन सर्व साक्षी ऐसा । दुस्तर हा भव ॥
निस्तरावया । जाउनि सत्वर ॥
आह्मि सविस्तर । पूजा करूं त्याची ॥
चला हो पूजा करूं त्याची । आरती० ॥ ६ ॥
तल्लिन होउनि गुरुचरणीं । जोडुनि भक्तराजपाणी ॥
मागे हेंचि जनकजननी । अंतीं ठाव देई चरणीं ॥ चा० ॥
नको मज दुजें आणिक कांहीं । भक्तवत्सला ॥
दीनदयाळा । परम कृपाळा ॥
श्रीपदकमळा । दास नित्य याची ॥
उपेक्षा करूं नको साची । आरती० ॥ ७ ॥

(२)

त्रिगुण त्रयमूर्ती दत्त हा जाणा ॥
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ॥
नेती नेती शब्द नये अनुमाना ॥
अखंड समाधी ध्यान मुनिजनां ॥ १ ॥
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ॥
आरति ओवाळीतां हरली भवचिंता ॥ धृ० ॥
सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ॥
अभाग्यासी कैंची कळेल ही मात ॥
पराहि परतली तेथें कैंचा हेत ॥
जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥ ज० ॥
दत्त येऊनियां उभा ठाकला ॥
भावें साष्टांगेंसी प्रणिपात केला ॥
प्रसन्न होउन आशीर्वाद दीधला ॥
जन्ममरणांचा फेरा चुकवीला ॥ ३ ॥ ज० ॥

दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ॥
हारपलें मन झालें उन्मन ॥
मीतूंपणाची झाली बोळवण ॥
एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥
जय देव जय देव जय० ॥

श्री देव्यै नमः




दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ॥
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं ॥
वारीं वारीं जन्ममरणातें वारीं ॥
हारीं पडलों आतां संकट नीवारीं ॥ १ ॥

जय देवी जय देवी महिषासुरमथिनी ॥
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ ज० ॥ धृ० ॥

त्रिभुवन भुवनीं पहातां तुज ऐसी नाहीं ॥
चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ॥
साही विवाद करितां पडिले प्रवाहीं ॥
ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही ॥ ज० ॥ २ ॥

प्रसन्नवदनें प्रसन्न होसी निजदासां ॥
क्लेशापासुनी सोडीं तोडीं भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ॥
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ जय० ॥ ३ ॥

# श्री गणेश भक्ति.



श्लोक.

घोर हा नको फार कष्टलों । निज हितास मी व्यर्थ गुंतलों
वारिं शीघ्र संसारयातना । भो दयानिधे श्रीगजानना १
विषयगोडि ही लागली मला । यामुळें असे घात आपुला
कळुनिया असे भ्रांति जाइना । भो दयानिधे श्रीगजानना २
त्रिविध ताप हे जाळती अति । काम क्रोध हे फार पीडिती
चित्र सर्वथा स्वस्थ राहिना । भो दयानिधे श्रीगजानना ३
स्त्रीधनादि हे आठवी मनीं । छंद हाचि रे दिवस यामिनी
विसरलों तुला दीनपालना । हे दयानिधे श्रीगजानना ४
माउली पिता बंधु सोयरा । तूंचि आमुचा निश्चयें खरा
शरण तूज मी विघ्नभंजना । हे दयानिधे श्रीगजानना ५
ह्मणवितों तुझा दास या जनीं । सकळ व्यापका जाणसी मनीं
भुक्ति मुक्ति दे भक्तपालना । हे दयानिधे श्रीगजानना ६
काय काय रे साधनें करूं । मी असें तुझें मूर्ख लेकरूं
दूषिती मला द्वैतभावना । हे दयानिधे श्रीगजानना ७
विषयचिंतनें शोक पावलों । देहबुद्धिनें व्यर्थ नाडलों
भालचंद्रजी तोडिं बंधना । हे दयानिधे श्रीगजानना ८
गजमुखा तुझी वाट पाहतां । नेत्र शीणले जाण तत्वतां
भेटसी कधीं भ्रमनिवारणा । हे दयानिधे श्रीगजानना ९

प्रभु समर्थ तूं आमुचे शिरीं । वेष्टिलों असे विषय पामरीं
नवल हेंचि रे वाटतें मना । हे दयानिधे श्रीगजानना १०

अगुण अद्वया तूं परात्परा । पार नेणवे विधि हरी हरां
अचल निर्मला नित्य निर्गुणा । हे दयानिधे श्रीगजानना ११

जिवन व्यर्थ हें तूज-वेगळें । स्वहित आपुलें काय साधिलें
सुख नसे सदा मोह-यातना । हे दयानिधे श्रीगजानना १२

फारसें मला बोलतां नये । पाउलें तुझीं देखिलीं स्वयें
मांडिली असे बहुत वल्गना । हे दयानिधे श्रीगजानना १३

दीनबंधु हें ब्रीद आपुलें । साच तूं करीं दाव पाउलें
मंगलालया विश्वजीवना । हे दयानिधे श्रीगजानना १४

नाशवंत रे सर्व संपदा । हे नको मला पाव एकदा
क्षेम देउनी चित्तरंजना । हे दयानिधे श्रीगजानना १५

जातसे घडी पळ युगापरी । लागली तुझी खंति अंतरीं
स्वामि आपुला विरह साहिना । हे दयानिधे श्रीगजानना १६

कळेल तें करीं विनवणें किती । तारिं दीन वा मारिं गणपती
सकल दोषसंकटाब्धि शोषणा । हे दयानिधे श्रीगजानना १७

आवडे मला त्रिभुवनाकृती । पूजुनी वरी करिन आरती
धांव पाव रे मोदकाशना । हे दयानिधे श्रीगजानना १८

हृदय कठिण तूं करिं न सर्वथा । अंत आमुचा पाहसि पूरता
सिद्धिवल्लभा मुषकवाहना । हे दयानिधे श्रीगजानना १९

कल्पवृक्ष तूं कामधेनु वा । लाविजे स्तनीं जीविच्या जिवा
हाचि हेत रे शेषभूषणा । हे दयानिधे श्रीगजानना २०

तारिं मोरया दुःख सागरीं । गोसावीनंदन प्रार्थना करी
आत्मया मनीं जाण चिद्घना । हे दयानिधे श्रीगजानना २१

२८७८ ५१

अभंग.

करूं प्रथम नमन । प्रार्थूं देव गजानन ॥
गौरीहराचा कुमर । त्याचें नांव लंबोदर ॥
नाचत आला गणपती । पायीं घागऱ्या वाजती ॥
टिळा केशरी कस्तूर । अंगीं चर्चिला शेंदूर ॥
तो हा गणांचा गणपती । तुका ह्मणे राहो चित्तीं ॥ १ ॥

पद

जिल्हा काफी ताल दादरा.

नमीतसों ब्रह्मकुमरि नायका गजानना ।
रे नायका गजानना ॥ नमी० ॥
वाम अंगीं शारदा वाढवी तुझी प्रभा ।
नम्र सदा दास आह्मीं वंदितों शुभानना ॥
रे वंदितों शुभानना ॥ नमी० ॥ १ ॥

पद

चाल— राम स्मरावा राम

शरण शरण गणराज गजानन ॥ शरण शरण० ॥
दासांचा तूं वाली असती धरिसी तूं अभिमान ॥ गजा० ॥
विघ्नविनाशन भवभयभंजन एक तुझें अभिधान ॥ ग० ॥
पूजन अर्चन ध्यान धारणा नेणे मी अज्ञान ॥ गजा० ॥
हीन दीन अतिलीन पदीं मी मजसि करीं सज्ञान ॥ ग० ॥
भाव पाहुनी ठेव समर्था करुनी चरणीं श्वान ॥ गजा० ॥

श्लोक

तुझे वंदुनी पाय लोकाभिरामा ।
तुला मागतों शोक चिंताविरामा ।
तुझा छंद लागो समर्था त्रिकालीं ।
तुझें नाम येवो मुखीं अंतकालीं ॥ १ ॥

## श्री शंकराय नमः



### मानस पूजेचे श्लोक

रत्नैः कल्पितमासनं हिमजलैः स्नानं च दिव्यांबरं
नानारत्नविभूषितं मृगमदामोदांकितं चंदनम् ॥
जातीचंपकबिल्वपत्ररचितं पुष्पं च धूपं तथा
दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यताम् ॥ १ ॥
सौवर्णे मणिरत्नखंडरचिते पात्रे घृतं पायसं
भक्ष्यं पंचविधं पयोदधियुतं रंभाफलं पायसम् ॥
शाकानामयुतं जलं रुचिकरं कर्पूरखंडोज्ज्वलं
तांबूलं मनसा मया विरचितं भक्त्या प्रभो स्वीकुरु ॥ २ ॥
छत्रं चामरयोर्युगं व्यंजनकं चादर्शकं निर्मलं
वीणाभेरिमृदंगकाहलकला गीतं च नृत्यं तथा ॥
साष्टांगः प्रणतिः स्तुतिर्बहुविधा ह्येतत्समस्तं मया
संकल्पेन समर्पितं तव विभो पूजां गृहाण प्रभो ॥ ३ ॥
आत्मा त्वं गिरिजापतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहं
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ॥
संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥ ४ ॥
करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ॥
विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जयजय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो ॥ ५ ॥

# शिव-महिम्न-स्तोत्र.

( श्लोक-पृथ्वी. )

महेश ! महिमा तुझा मज अगम्य ठावा नसे
स्तवार्थ ह्मणुनी नसें उचित मी जरी, ते तसे[1] –
कृतार्थ विधिदेवही स्तव करून झाले कसे ?
यथामति करी तुझें स्तवन तो न दोषी दिसे. १

अगाध महिमा तुझा गुण अनंतही माउली[2]
स्वरूप तव वर्णितां श्रुतिहि 'नेति' संवादली;
यथार्थ कवणा घडे स्तवन वा तुझें चिंतन
तथापि चरणीं सुधी कवण तो न दे वाङ्मन ? २

महामृतमया गिरा सहजही निघे जेथुनी
अशा तुज करील कां चकित वाग्विधीची मनीं ?
कुठें मम अशुद्ध ही विमल हो असे चिंतुनी
नियुक्त करितों गिरा तव गुणांचिया वर्णनीं. ३

तव श्रुतिनिवेदिते त्रिगुणयुक्त ऐश्वर्य जें-
चराचर रची, धरी सहज, संहरीं सर्वजें
अभद्रमति कैक ते ! वरद ! निंदिती गर्जुनी
वरूनि मधु आंतुनी कुटिलशा वृथाभाषणीं ४

कितीक हतधी तुझें विभव दूषिती, काढिती
कुतर्क बहु, मोहिती जन अनेक, ते बोलती
कसें जग रची, कशी तनु धरी, करी कोण तो
उपाय तरि आसरा कवण द्रव्यही योजितो ? ५

अनीश असतील कां अवयवान्विता वस्तु या
न जन्मचि कसा, नसे मृति कशी समस्तां तयां ?

---

१ अनभिज्ञ २ वेदमाता

वृथाचि वदणें नसे अतिविचित्र हें[1] निर्मिता;
विमूढ जनसंशयें बुडतसे स्वयें तत्वता. ६

अर्थात, इतरत्रही कपिल सांख्य इत्यादिनीं-
स्वरूप तव वर्णिलें 'शिवद हेंच' संपादुनी
यथारुचि अधीर ते परि तुलाचि पावावया
जशा जलनिधीस त्या सरळ-वक्रगामी नद्या. ७

मनुष्य-शिर-मालिका, परशु, चर्म, खट्वांग तें
चिताजनित भस्म तें, फणि, महोक्ष, मायापते!
तुला प्रिय, न मोहिती विषय आत्मरूपीं-रता
स्वशक्ति नयनें तुझ्या सुरहि होय संपादिता. ८

ध्रुवाध्रुव-विचारणा करुनियां वदे एक हें
असे ध्रुव, वदे दुजा ध्रुव न विश्व मिथ्याच हें,
ध्रुवाध्रुवहि बोलतो जन कुणी, नसे एकता
स्तवीं मज न लाज, ही खचित धीट वाचालता ९

तपोनिधि! हरी वरीं[2] विधिहि तो करी खालतीं[3]
प्रयत्न बहु त्यां कळे महति वैभवाची न ती,
तुझी सगुण-भक्ति ते करुनिया तुला पावले
प्रभो! न तव सेवनीं कवण भाग्य भक्तां मिळे १०

अगा! त्रिपुरमर्दना! त्रिभुवनीं वळें आगळा
नसे दशशिरा, जयें सकळ लोक लाथाळिला,
प्रचंड बळ तें तसें तवचि पूजनें पावला,
समर्पण करीं शिरें कमलशीं न कांचावला. ११

अचाट बळ पावला तुज भजोन, केली मही
अनाथ, उलथावया तव निधान कैलासही-

1 जग २ स्वर्गीं ३ पातालीं

सजे अधम, दापुनी गिरि तदा पदाग्रैं दिलैं
अधःपतन रावणा, कुजन भाग्य येतां चळे. १२

यथाक्रम समस्तही महिपती वळें जिंकुनी
न इंद्रपद दिव्य तें असुर बाण[1] मानी मनी,
विचित्र ह्मणवे न तें, तव पदींच तो लोळला,
धरून पद तें पदा जन न कोणत्या पावला. १३

असह्य विष उद्भवे, प्रळय-भीति देवासुरीं
तईं प्रगटली, महा-विष पिऊन तें सत्वरीं-
अनर्थ चुकवा हरा ! जरिहि कंठ झाला निळा,
जगद्भयनिवारणा अशुभही न देतें मळा १४

अनंग विजयी वृथा शर न होय ज्याचा कधीं-
सुरासुरनरीं, तुझेवर शरा नियोजी जधीं
तुला इतर देवतासम गणून तें नाशिला,
खरोखर जितेंद्रियीं अनय होत नाहीं भला. १५

महेश ! जगरक्षणास्तव जरी तुझें नृत्य तें,
मही थरथरे पदें, गगन तारकायुक्त तें-
चळे भुजजवें, जटानिहत होय स्वर्लोक तो-
महाविकल, भीषण प्रभुपणा खरा वाटतो. १६

वियत्[2] भरुनिया खुले अधिक तेथ तारांनिशीं
समुद्रवलयांकिता परि धरा करी द्वीपशी
प्रवाह असला दिसे अणुचि मस्तकीं आपुल्या
करीं प्रगट आपुली महति निश्चयें स्वामिया. १७

रवींदु वसुधारथीं उभय चक्रसे योजिले,
करा विधिहि सारथी धनु करा गिरीचें भलें,

---

१ बाणासुर २ आकाश

हरीच शर मानिला त्रिपुरमर्दनीं, काय तो-
तृणीं श्रम ! अचिंत्यही प्रभु करीं स्वलीलार्थ तो. १८
हरा हरि करी तुझ्या चरणपूजनातें जंई
सहस्र कमलीं कमी कमल एक झालें तंई
स्वनेत्रकमलें करीं स्वपणपूर्ति, तेणे मिळे-
सुदर्शन सदा धरावन घडे जयाच्या बळें. १९
ऋतू[1] विलय पावती, फल पुढें जनां देतसां
यथार्थ समयीं, तुह्मी सकल कर्मसाक्षी असां,
श्रुतींवर तुह्मांवरी भरंवसा पुरा ठेउनी-
करी विविध कर्म तें जन मनीं फलें इच्छुनी. २०
क्रियाकुशल दक्ष[2] तो ऋषि सुरादि यज्ञास्तव
अनेक मिळवी, करी मख, न मान ठेवी तव,
क्षणांत मख भंगिला, त्वरित नाश देते क्रिया-
खरोखर जनीं नसे रचियली जरी श्रद्धया.[3] २१
प्रजापति[4] सुते स्थळीं सुरतिभाव ठेवी, धरी-
मृगाकृति, पळे मृगी, मृगहि मागुनी अंबरीं,
तयावर तुह्मी तदा प्रखर बाण सोडा, पळे-
विधीहि, अझुनी परी न शरवेध देवा ! टळे. २२
स्वरूप निज मानुनी बहु, धरी करीं चाप तें
तृणासम करा स्मरा[5] त्वरित भस्म, हें पाहतें
उमा तवचि अंगना जरि तुला ह्मणे स्त्रैण ती
प्रियांस युवती तरी सकलही अशा वर्णिती. २३
श्मशान रतिभूमि ती, संवगडी भुतां ओंगळा,
चिता-भसित लेपना, मनुजमुंडमाळा गळां,
हरा ! अशुभ यापरी असुनिया दिसाया जनां
सदोदितहि ओंपिशी शुभचि केलिया कीर्तना. २४

---

१ यज्ञ २ दक्ष राजा ३ श्रद्धेनें ४ ब्रह्मदेव ५ मदनाला

मन स्थिर करोनिया हृदय-गर्भदेशीं यती
समाधिसुखसागरीं बुचकळ्या जधीं मारिती
प्रसन्ननयनीं गळे जळ, उठोनि रोमांच ते
तनूवर, करी असें परम वस्तु तुह्मीच ते. २५

त्वदर्चन करी स्मरे सुजन अंतरीं रंगला
रवींदुपवनाग्निभूजलतनुस्थरूपें तुला,
अशी न मितिदर्शकें सुखवितात नामें मला,
दिसे न तुजवांचुनी स्थल न वस्तुही मंगला. २६

त्रयी, त्रिभुवनें, हरा ! त्रिविध देव, वृत्तित्रय
असा बहुत गुढही तव तुरीय रूपाशय
करी प्रगट ओम् जयीं अउम तीन मात्राक्षरें
सुसूक्ष्म रव सूचवी शरणदा तुझें रूप रे ! २७

भवादि तव वर्णिते श्रुतिहि अष्ट नामें असा
अतिप्रिय सुरासुरां सकल मानवी मानसां
महेश ! असशी खरा भुवनजीवचैतन्य गा !
प्रमाण तुजला करूं सतत आत्मया सर्वगा ! २८

नमो वननिवास, जो जवळ जाणत्या, नेणत्या
सुदूर, तुज त्या नमो मदनमारका ! योगिया
नमो तुज, लहान तूं अति-वयस्क तूं त्या नमो !
परोक्ष अपरोक्ष तूं तुज परात्परातें नमो ! २९

नमो तुज भवा ! रजोगुण-बळें जगा निर्मिशी
नमो तुज हरा ! तमो गुण-बळें तया नाशिसी

नमो मृड तुला जगा सतत सत्वतः पोशिसी
नमो त्रिगुणशून्यशा तुज शिवा ! सदा मानसीं ३०
कृपानिधि ! न शुद्ध मन्मति अविद्यही मी खरा,
अनंतगुण वर्णवे विभव केविं या पामरा,
असा विकल चित्तनें बहु परी करीं घेउनी
पदीं कुसुमहार हा रघुनीहि ध्या अर्पुनी. ३१

मंदाक्रांता

एका ठायीं जलनिधिजला सर्वही सांठवोन
विद्यादेवी असितगिरिच्या कज्जलें तें भरोन
पृथ्वीपृष्ठीं सुरतरुचिया लेखणीनें लिहील
ईशा रात्रंदिन गुण तुझे नातरी संपतील ३२

## अंतिम प्रार्थना

मालिनी

सकल भुवनकर्त्या, मंगला, दुःखहर्त्या
अखिलहि शुभदेत्या निर्जरां तेंवि दैत्यां
भवजलधितरी तूं पुष्पदंताभिमानी
त्वरित मज समर्था उद्धरीं शूलपाणी ३३

भुजंगप्रयात

तुझे वंदुनी पाय रामाभिरामा।
तुला मागतों शोक-चिंता-विरामा॥
तुझा छंद लागो, घडो जन्म सार्थ।
प्रभो ! श्री हरी माधव श्री समर्थ॥ ३४

# शिवस्तुतीचे श्लोक.

कैलासराणा शिव चंद्रमौळी । फणींद्र माथा मुगुटीं झळाळी
कारुण्यसिंधू भवदुःखहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १
रवींदुदावानल पूर्ण भाळीं । स्वतेज नेत्रीं तिमिरांध जाळीं
ब्रह्मांडधीशा मदनांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २
जटा विभूती उटि चंदनाची । कपालमालार्पित गौतमाची
पंचानना विश्वनिवांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ३
वैराग्य योगी शिव शूळपाणी । सदा समाधी निज बोधवाणी
उमानिवासा त्रिपुरांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ४
उदार मेरू पति शैलजेचा । श्री विश्वनाथू ह्मणती सुरांचा
दयानिधी तूं गजचर्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ५
भुजंगमाला धरि सोमकांत । ब्रह्मादि वंदी अमरादि नाथ
गंगा शिरीं दोष महा विदारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ६
कर्पूर गौरी गिरिजा विराजे । हळाहळें कंठ निळाचि साजे
दारिद्र्य दुःख स्मरणें निवारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ७
स्मशान क्रीडा करितां सुखावें । तो देव चूडामणि कोण पाहे
उदास मूर्ती जटा भस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ८
भूतादिनाथू अरि अंतकाचा । तो स्वामि माझा ध्वज शांभवाचा
राजा महेश बहु वाहुधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ९
नंदी हराचा हरि नंदिकेश । श्री विश्वनाथू ह्मणती सुरेश
सदाशिव व्यापक तापहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १०
भयानकू भीम विक्राळ नग्न । लीलाविनोदें करि काम भग्न
तो रुद्र विश्वंभर दक्ष भारी । तुजवीण शंभो मज कोण तारी ११
इच्छा हराची जग हें विशाळ । पाळी रची तो करि ब्रह्मगोळ
उमापती भैरव विघ्नकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १२

भगीरथी तीर सदा पवित्र । जेथें असे तारक ब्रह्ममंत्र
विश्वेश विश्वंभर त्रिनेत्र धारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १३
प्रयाग वेणी सकळै हराच्या । पादारविंदीं वहती हरीच्या
मंदाकिनी मंगल मोक्षकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १४
किर्ती हराची स्तुति बोलवेना । कैवल्य दाता मनुजा कळेना
एकाग्रनाथ विष अंगिकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १५
सर्वांतरी व्यापक जो नियंता । तो प्राणलिंगा जवळी महंता
अंकीं उमा ते गिरिरूप धारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १६
सदा तपस्वी असे काम धेनू । सदा सतेज शशि कोटि भानू
गौरीपती जो सदा भस्मधारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १७
कर्पूर गौर स्मरल्या विसावा । चिंता हरी जो भजकांस दैवा
अति स्वहीत सुचना विचारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १८
विराम काळीं विकळ शरीर । उदास चित्तीं न धरेच धीर
चिंतामणी चिंतनें चित्त हारी । तुजवीण शंभो मज कोण तारी १९
सुखावसानें सकळा सुखाची । दुःखावसानें टळतीं जयाचीं
देहावसानीं धरणी थरारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २०
अनुहात शद्ब गगनीं न माय । तिचेनि नादें भवशून्य होय
कथा निजांगें करुणा कुमारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २१
शांति स्वलीला वदनीं विलासे । ब्रह्मांड झोळी असुनी न दीसे
भिल्ली भवानी शिव ब्रह्मचारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २२
पीतांबरें मंडित नाभि ज्याची । शोभा जडीत वरि किंकिणीची
श्रीवेद दत्त दुरितांतकारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २३
जिवा शिवाची जडली समाधी । विटला प्रपंच तुटली उपाधी
शुद्ध स्वरें गर्जति वेद चारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २४
निधान कुंभ भरला अभंग । पहा निजांगें शिव ज्योतिर्लिंग
गंभीर धीर सुरचक्र धारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २५

मंदार बिल्वें बकुलें सुवासी । माला पवित्र वाहा शंकरासी
काशी पुरी भैरव विश्वतारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २६
जाई जुई चंपक पुष्प जाती । शोभे गळां मालती माळ हातीं
प्रताप सूर्य शरचाप धारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २७
अलक्ष्य मुद्रा श्रवणीं प्रकाशे । संपूर्ण शोभा वदनीं विकासे
नेई सुपंथें मज पैल तीरीं । तुजवीण शंभो मज कोण तारी २८
नागेश नामा सकळां जिव्हाळा । मना जपे रे शिव मंत्र माळा
पंचाक्षरी ध्यान गुहा विहारी । तुजवीण शंभो मज कोण तारी २९
एकांति येरे गुरुराज स्वामी । चैतन्य रूपीं शिवसौख्य नामी
शिणलों दयाळा बहुसाळ भारी। तुजवीण शंभो मज कोण तारी ३०

शास्त्राभ्यास नको श्रुती पढुं नको तीर्थासि जाऊं नको ॥
योगाभ्यास नको व्रतें मख नको तीव्रें तपें ती नको ॥
काळाचें भय मानसीं धरुं नको दुष्टांस शंकूं नको ॥
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको ॥ ३१ ॥

वंदे शंभुमुमापतिं सुरगुरुं वंदे जगत्कारणम् ॥
वंदे पन्नगभूषणं मृगधरं वंदे पशूनांपतिम् ॥
वंदे सूर्यशशांकवन्हिनयनं वंदे मुकुंदप्रियम् ॥
वंदे भक्तजनाश्रयं च वरदं वंदे शिवं शंकरम् ॥

शांतं पद्मासनास्थं शशधरमुकुटं पंचवक्त्रम् त्रिनेत्रम् ॥
शूलं वज्रं च खड्गं परशुमभयदं दक्षभागेवहंतम् ॥
नागं पाशंच घंटां प्रलयहुतवहं सांकुशं वामभागे ॥
नानालंकारयुक्तं स्फटिकमणिनिभं पार्वतीशं नमामि ॥

पद १

भोलानाथ दिगंबर हैं दुःख मेरा हरोरे ॥ धृ० ॥
चंदन चावल बेलकि पतियां ॥
शिवजीके माथा धरोरे ॥ भोला० ॥ १ ॥
व्याघ्र कडासन आसन बैठे ॥
गलेरुंड माला धरोरे ॥ भोला० ॥ २ ॥
अर्ध अंगमों गौरि गजानन ॥
मस्तकों गंगा धरोरे ॥ भोला० ॥ ३ ॥
मीराके प्रभु गिरधर नागर ॥
मैं तेरे पांव परोरे ॥ भोला० ॥ ४ ॥

पद २

भज मन शंकर भोलानाथ ॥ धृ० ॥
एकहि लोटा भर जल चाही ॥
चावल बेलकि पात ॥ भजमन० ॥ १ ॥
अर्धांगिं गौरी जटामें गंगा ॥
महिमा वर्णि न जात ॥ भज० ॥ २ ॥
बडे व्याघ्रांबर सांई विश्वंभर ॥
त्रिशूल पेहरत हात ॥ भज० ॥ ३ ॥
अंग बिभूत श्मशानीं लावत ॥
मध्व मुनीश्वर साथ ॥ भज० ॥ ४ ॥

पद ३

शंकरजी मैं बाल तुह्मारो । दया करो महाराजरे
पतितके तुम करुणा सागर । आज रखो प्रभु लाजरे ॥ धृ० ॥
खाना पीना सुखसे सोना, धामधूमको राजरे ॥
इस दुनियामें पैदा होकर । येहि किया सब काजरे ॥ शंकर ॥१॥

अपना अपना कर कर आखर। जनम गमाया सारारे ॥
भजन पूजनकी बात नहीं कछु। गया जनमका फेरारे ॥
॥ शंकरजी ॥ २ ॥

चरन कमलपर सरन आया जो। दगा न देते फेररे ॥
श्रवण सुनि वह बात बडोंकी। घेरि लियो प्रभु द्वाररे ॥
॥ शंकरजी० ॥ ३ ॥

व्याघ्र चर्मपर जटा बटाला। नंदीपर संवाररे ॥
आनंदात्मज धून लगी है। शिव शिव मूलाधाररे ॥
॥ शंकरजी मैं बाल तुह्मारो० ॥ ४ ॥

पद ४

भज भज भव जलधि माजि मनुजा शिवाला ॥ ध्रु ॥
धरिशिल दृढ चरण कमल। घडि भरि तरि करुनी विमल ॥
तरिच सकल पाप शमल। त्यजरे भवाला ॥ भज० ॥ १ ॥

सांडुनियां विषय वमन। झडकरि करिं षडरिदमन ॥
पूजिं मन हें करुनि सुमन। गिरिजाधवाला ॥ भज० ॥ २ ॥

सावध हो करिशि काय। शंकर गुरु बापमाय ॥
चिंतुनि कवि रामपाय। हृदयीं निवाला ॥ भज० ॥ ३ ॥

पद ५ भैरवी—दादरा.

तारि तारि तारि आतां गौरी शंकरा ॥ ध्रु ॥
जन्ममरण येर-झार, चुकवुनि हा भव निवार,
शीणलों मी दीन फार, देइं आसरा ॥ १ ॥
तुमजे मी कोण असे, व्यर्थ वया दवडितसे,
दीन दास शरण असे, चंद्र शेखरा ॥ २ ॥

पद ६ मांड—दादरा.

त्रिपुरहनन मदनदहन पुरवि सकल काम।
सकल भुवन धाम। हृदयिं दे विराम ॥ १ ॥
अखिल दुरित ताप हरी रम्य सदाशिव नाम।
दास माधवास शिवा सत्वरिं करि निष्काम ॥ २ ॥

पद ७ चाल आन बान जिया मैं.

सांब सांब भज नरा रे मोक्षदायि रे। वरदान वरें घेई त्वरें ॥ ध्रु. ॥
अचल प्रेम धरुनि खरे। भजासि तरिच सार्थक रे।
नर तनु तुज लाभालि रे। फिरुनि सकल फेरे ॥ १ ॥
ऋषि महंत श्रमति किती। त्यजुनि सकल नाम जपती।
श्रुति स्मृतीहि वदति नेति। समज उमज बा रे ॥ २ ॥

पद ८

अगड भं अगड भं बाजे डमरू,
नाचे सदाशिव जगद्गुरु ॥
नाचे ब्रह्मा नाचे विष्णु नाचे महादेव।
जहां देखे पार्वती नाचे सबहि देव ॥ १ ॥
भांग खाय जहर खाय कालीया धतूर ॥
जोगिनीके पीछे लगे नंगे अवधूत ॥ २ ॥
काशि विश्वनाथ नाम जाके वीराजे ॥
आगे भैरव पीछे हनुमान जागे ॥ ३ ॥

---

सांब सदाशिव शिव हर रे ॥
शिव सांब सदाशिव शिव हर रे ॥

## श्री रामरक्षास्तोत्र-श्लोक.

रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरम् ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेंद्र सत्यसंधं दशरथतनयं श्यामलं शांतमूर्तिं ।
वंदे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥ १ ॥
श्रीराम राम रघुनंदन राम राम ।
श्रीराम राम भरताग्रज राम राम ।
श्रीराम राम रणकर्कश राम राम ।
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥ २ ॥
श्रीरामचंद्र चरणौ मनसा स्मरामि ।
श्रीरामचंद्र चरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचंद्र चरणौ शिरसा नमामि ।
श्रीरामचंद्र चरणौ शरणं प्रपद्ये ॥ ३ ॥
माता रामो मत्पिता रामचंद्रः ।
स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ।
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुः ।
नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ ४ ॥
दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामेच जनकात्मजा ॥
पुरतो मारुति र्यस्य तं वंदे रघुनंदनम् ॥ ५ ॥
लोकाभिरामं रणरंगधीरं । राजीवनेत्रं रघुवंशनाथम् ।
कारुण्यरूपं करुणाकरं तं । श्रीरामचंद्रं शरणं प्रपद्ये ॥ ६ ॥
आपदामपहर्तारं दातारं सर्व संपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ७ ॥
रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोस्म्यहम् ।
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ८ ॥

## श्रीरामस्तुति.

संसार संगें बहु शीणलों मी। कृपा करीं रे रघुराज स्वामी ॥
प्रारब्ध माझें सहसा टळेना। तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १
मन हें विकारी स्थिरता न येरे। त्याचे निसंगें भ्रमतें भलेंरे ॥
अपूर्व कार्या मन हें विटेना। तुज० ॥ २ ॥
माया प्रपंचीं बहु गुंतलोंरे। विशाळ व्याधी मधिं बांधलोंरे ॥
देहाभिमानें अति राहवेना। तुज० ॥ ३ ॥
दारिद्र्य दुःखें बहु कष्टलों मी। संसार मायेंतचि गुंतलों मी ॥
संचीत माझें मजला कळेना। तुज० ॥ ४ ॥
लक्ष्मीविलासीं बहु सौख्य वाटे। श्रीराम ध्यातां मनि कष्ट मोठे ॥
प्रपंच वार्ता वदतां विटेना। तुज० ॥ ५ ॥
अहो रात्र धंदा करितां पुरेना। प्रारब्ध योगें मज राहवेना ॥
भव दुःख माझें कधिंही टळेना। तुज० ॥ ६ ॥
तीर्थासि जातां बहु दुःख वाटे। विषयांतरी राहुनि सौख्य वाटे ॥
स्वहीत माझें मजला कळेना। तुज० ॥ ७ ॥
मी कोठुनी कोण आलों कसाहो। स्त्रीपुत्र स्वप्नांतचि गुंतलोंहो ॥
ऐसें कळोनी मन हें विटेना। तुज० ॥ ८ ॥
असत्य वाक्यानि मुकाचि झालों। अदत्त दोषें दुःखीं बुडालों ॥
अपूर्व करणी कशि आठवेना। तुज० ॥ ९ ॥
विश्रांति देहीं अणुमात्र नाहीं। कुळाभिमानें पडलों प्रवाहीं ॥
अशांतुनी दूर कधीं कळेना। तुज० ॥ १० ॥
विषयी जनांनीं मज आळवीलें। प्रपंच पाशांतचि बुडवीलें ॥
स्वहीत माझें होतां दिसेना। तुज० ॥ ११ ॥
नरदेह दोषां वर्णूं कितीरे। उच्चाट माझे मनिं वाटती रे ॥
ललाट रेषा कधिं पालटेना। तुज० ॥ १२ ॥
मजला अनाथा प्रभु तूंच दाता। मी मूढ कीं जाण असेंच आतां ॥
दासा मनीं आठव वीसरेना। तुज० ॥ १३ ॥

## करुणाष्टकें.

१

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परम दिनदयाळा ! नीरसी मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति ! मति माझी आपुलीशी करावी ।
सकल त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥ २ ॥

तनुमनधन माझें राघवा ! रूप तुझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार ओझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचल भजनलीला लागली आस तूझी ॥ ३ ॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळ स्वजनमाया तोडितां तोडवेना ॥
घडि घडि बिघडे हा निश्चयो अंतरीचा ।
ह्मणवुनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ४ ॥

जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी ॥
तळमळ निवर्वी रे राम कारुण्यसिंधू ।
षड्रिपु कुळ माझें तोडिं याचा समंधू ! ॥ ५ ॥

स्वजनधनाचा कोण संतोष आहे ! ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडोनि जाती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ६ ॥

सकळ जन भवाचे आथिले वैभवाचे ।
जिवलग मज कैंचे चालते हेच साचे ॥
विलगविषमकाळीं सांडिती सर्व माळीं ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥ ७ ॥
उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळजनविरामीं रामविश्रामधामीं ॥
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रघुकुळटिळका ! रे आपुलेसें करावें ॥ ८ ॥

२

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां १
तुझें रूप हें लोचनीं म्यां पहावें । तुझे गुण गातां मनेंसी रमावें
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघू० ॥ २ ॥
मनीं वासना भक्ति तुझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी
वसावें मदीयांतरीं नाम घेतां । रघू० ॥ ३ ॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा
उपेक्षूं नको गुणवंता अनंता । रघू० ॥ ४ ॥
नको द्रव्यदारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा
सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा । रघू० ॥ ५ ॥
भवें तापलों प्रीतिछाया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी
मला संकटीं सोडवावें समर्था । रघू० ॥ ६ ॥
मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी
नको संशयो तोडिं संसार वेथा । रघू० ॥ ७ ॥
समर्थापुढें काय मागूं कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना
तुटे संशयो नीरसी सर्व चिंता । रघू० ॥ ८ ॥
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । ह्मणे दास भक्तासि रे उद्धरावें
तुटे ब्रीद आह्मांस सोडोनि जातां । रघू० ॥ ९ ॥

## श्रीराम मंत्राचे श्लोक.

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी।
जडे गर्व ताठा अभिमान पोटीं।
कसा कोणता नेणवे आज पारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे॥ १॥

नको कंठ शोषूं बहु वेद पाठीं।
नको तूं पडूं साधनाचे कपाटीं।
घडे कर्म खोटें बहु तो दगारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे॥ २॥

तुला ही तनू मानवी प्राप्त झाली।
बहू जन्म पुण्यें फळालागि आली।
तिला तूं कसा गोंविसी वीषयीं रे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे॥ ३॥

जरी ही तनू रक्षिसी पुष्ट कांहीं।
तरी भोग तो राग होईल देहीं।
विपत्तीपुढें ते नये बोलतां रे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे॥ ४॥

खुळे हस्तपादादि हे मग्न होती।
दिठी मंद होवोनियां कर्ण जाती।
तनू कंप सर्वांगिं होती कळारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे॥ ५॥

कफें कंठ हा रोध होईल जेव्हां।
अकस्मात तो प्राण जाईल तेव्हां।
तुला कोण येथें सखे सोयरे रे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे॥ ६॥

तुझें बाल्य तारुण्य गेलें निघोनी ।
कळेना कसें लोक जाती मरोनी ।
करीसी मुलांची स्वहस्तें क्रिया रे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ७ ॥

दुराशा नकोरे परस्त्री धनाची ।
नको तूं करूं नीच सेवा जनाची ।
पराधीन कैसा भला दीससी रे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ८ ॥

मदें डोलसी बोलसी साधुवृंदा ।
कसें हीत तूं नेणसी बुद्धिमंदा ।
रिकामाचि तूं गुंतसी वाउगा रे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ९ ॥

बहू व्याप संताप तो मूळ पापा ।
गतायुष्य कोटी नये द्रव्य बापा ।
कळेना कसें कोणता तो नफारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १० ॥

तुझे आप्त द्रव्यार्थ नस्तोचि होती ।
तनू हे चितेमाजि ते बोळवीती ।
असें जाणुनी हीत माझें करारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ११ ॥

कुटुंबी स्त्रिया पुत्र ते दास दासी ।
बहू पोशिसी सोसुनी दुःखराशी ।
त्यजीं भार काबाड ओझें किती रे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १२ ॥

बहू इच्छिसी कीर्ति सन्मान कांहीं ।
सुखाचा कधीं अंतरीं लेश नाहीं ।

फुकाचें मुखीं नाम तें कां नये रे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १३ ॥

रवीसूत ते दूत विक्राळ येती।
तुझ्या लिंगदेहासि वोढोनि नेती।
तुला खांडिती मुंडिती दंडितीरे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १४ ॥

नको वीषयीं फारसा मस्त होऊं।
नको मान दंभामध्यें चित्त रोवूं।
नको भस्म लाऊं जटाभार कांरे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १५ ॥

नको फार मंत्राग्निच्या मंत्रदीक्षा।
नको जारणा मारणादी अपेक्षा।
कळायुक्त चातुर्यता वीकळारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १६ ॥

नको याग अष्टांग तो घोर प्राणा।
नको कृच्छ्र चांद्रायणी हट्ट जाणा।
अपभ्रंश हा मार्ग कीं वोखटारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १७ ॥

कदापी घडेना व्रतें यज्ञ दानें।
नसे द्रव्य गांठीं करावें जयानें।
घडेना घडे यद्यपी कां फुकारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १८ ॥

नसे सत्य कांहीं दिसे दो दिसांचें।
तुला लूटिती चोरटे लोक साचे।
स्त्रिया पुत्र कामा न येती तुलारे।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १९ ॥

नको तूं कदापी करूं तीर्थयात्रा ।
तनू दंडणीं क्षीणता सर्व गात्रा ।
करी ग्रस्त आयुष्य तूं कोण सारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २० ॥

तुला धर्म पाशीं करी बद्ध जेव्हां ।
कसा कोण तो सोडवी सांग तेव्हां ।
यमाला कदापी दया ते नयेरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २१ ॥

तपस्वी मनस्वी बहू पार गेले ।
दुजी सृष्टिकर्ते असे थोर मेले ।
चिरंजीव अल्पायु गेले कितीरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २२ ॥

बहू कामधंद्यामध्यें मग्न होसी ।
किती नांव रूपा जगीं मीरवीसी ।
कशाला तुला उंट घोडे नगारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २३ ॥

ह्मणे देश माझे भुमी गांव वाडे ।
शिर्वीकासनीं बैससी उंच लोढें ।
कसा उंच तूं मंचकीं लोळसीरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २४ ॥

दशग्रीव लंकापुरीं मस्त झाला ।
अकस्मात मृत्यूपुरी माजि गेला ।
चिरंजीव हें राज्य विभीषणारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २५ ॥

अधोमूख विष्ठेमध्यें माय पोटीं ।
पचे पिंड हा सोसुनी दुःख कोटी ।
स्मरेना कसें लाज नाहीं तुलारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २६ ॥

असें भोगुनी पंचचत्वारिमासी ।
पुढें दैवयोगें सख्या जन्मलासी ।
कसा वीसरे ध्यान सोहं पुढेंरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २७ ॥

कळे वायुचा स्पर्श होतांची जेव्हां ।
रडे बाळ सोहं ह्मणे जीव तेव्हां ।
पुढें खेळ नाना परी खेळसीरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २८ ॥

विसंदीस मातापिता बंधु जाणे ।
परी रोग नाना करी तेथ ठाणें ।
जरी दैवयोगें पुढें वांचलारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ २९ ॥

करी लग्न मुंजी पितामाय त्याचें ।
करी शाहणा मारूनी रूप साचें ।
करी पोटधंदा बरा लागलारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३० ॥

बहू पाहिलें पोशिलें मायबापीं ।
निघे भिन्न निंदूनिया पापरूपी ।
स्त्रियेचे मुळें सर्व ही दुर्गतीरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३१ ॥

शतायू नव्हे पूर्ण आयुष्य कांहीं ।
असें हीतआहित तें अद्यापि नाहीं ।
अशाही मध्यें बाल्य तारुण्य सारें ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३२ ॥

करीशील धर्माश्रमा अस्त जेव्हां ।
बहु घातपातीं घरीं होय तेव्हां ।
भरी पोट पोशी कुटुंबी बरारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३३ ॥

रवी ऊदयो अस्त तों पोटधंदा ।
स्तवी आर्जवी तो करी येर निंदा ।
कळेना पुढें काय होणार तें रे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३४ ॥

बहु ढोंग मागें पुढें मोहराचे ।
मदोन्मत्त होवोनियां तेथ नाचे ।
असे गर्व त्यालागिं नर्कासि थारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३५ ॥

अलंकार स्थानीं तनू सज्जवीतो ।
मना दर्पणीं पाहुनी रंजवीतो ।
कळेना जळे सर्पणीं रूप तेरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३६ ॥

बहु द्रव्य गांठीं पुन्हां मेळवीशीं ।
गुरु विप्र बंधू कसे चाळवीसी ।
दुराशा कशाला मशाला पुढें रे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३७ ॥

जरी क्षीण देहीं परी वृद्धकाळीं ।
करीती स्त्रिया सूत पणतू टवाळी ।
धना ऊचकी लागतां गूचकीरें ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३८ ॥

रवी जे घडी हाणितो काळ जेव्हां ।
श्रुती शद्ब हे गर्जती तास तेव्हां ।
ह्मणे क्षीण आयुष्य गलें तुझेंरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३९ ॥

कशी जन्मुनी माय त्वां वांझ केली ।
कशी लाज वंशा कुळा लावियेली ।
भूमिभार घोडा पशु हा खरारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४० ॥

कसा कोणता काळ येईल जेव्हां ।
दिनासारिखा काळ नेईल तेव्हां ।
तुझें वित्त तारूण्य लोपेल सारें ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४१

तुला खंडिती दंडिती यम पाकीं ।
तुला खडुनी अग्निकुंडांत टाकी ।
तुला ओढिती तोडिती सांडसेंरे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४२ ॥

असा भोग भोगोनियां कल्पकोटीं ।
पुन्हां जन्म घे लक्ष चौऱ्यांशि कोटी !
महासंकटीं हिंपुटी लोक सारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४३ ॥

७६ दा. क्र. २९७८



नको सोंग छंदें करूं ढोंग कांहीं ।
नको शिष्य शाखामठीं सूख नाहीं ।
अहंतेमुळें नाश होतो तपारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४४ ॥

नको चाउटी वाउगी या जनाशीं ।
हरी चिंतनी ध्यान लावीं मनासीं ।
अमोलीक हा काळ जातो वृथारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४५ ॥

महाघोर हा थोर संसार मोठा ।
कळे संतसंगें समूळींच खोटा ।
कळे भक्तिमुक्ति विरक्तीच गारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४६ ॥

त्यजा दुष्ट संगासि पाहा भल्यासी ।
करा हीत येऊं नका गर्भवासीं ।
जसें अंतिचें दुःख होतें जिवारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४७ ॥

बहू भोगीतां पूढती नर्क आहे ।
असें जाणुनी त्या सुखामाजी राहे ।
प्रपंची उगा मारिसी कां गपारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४८ ॥

कळे साधनें याविणें सर्व निंदी ।
हरेराम हा मंत्र जो त्यासि वंदी ।
हरेराम हे माळिकाक्षा धरारे ।
हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ ४९ ॥

समाप्त.

REFBK-0002878

REFBK-0002878